म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का.वा
दा. क्र. ३६७८



IRBK-0103648
IRBK-0103648

म. ग्रं. सं. ठाणे,
३६४८
वि.
का. व

# चंचला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

एका सुशिक्षित पण स्वतःचें मन जाणूं न शकणाऱ्या तरुण मुलीची जीवनांत झालेली दारुण वंचना हा ह्या हृदयस्पर्शी कथेचा विषय आहे.

ह्यांत चित्रित केलेल्या व्यक्ति आपल्या रोजच्या जीवनांत भेटतील अशाच आहेत. पण त्यांचा एकमेकांचा संघर्ष केवढें भयंकर वादळ निर्माण होण्यास कारणीभूत झाला!

चंचलेच्या भीषण अंतास जबाबदार कोण?

सर्वाधिकार सुरक्षित

प्रथमावृत्ति : १९५१

मुद्रक : श्री. मा. दळवी,
कल्पना प्रिंटिंग प्रेस,
दादर, मुंबई १४.

प्रकाशक : के. भि. ढवळे,
श्री-समर्थ सदन,
गिरगांव, मुंबई ४.

ती० आईला अर्पण

विष्णु

# हृद्गत

'चंचला' कादंबरी ही पत्ररूपानें लिहिण्याची कल्पना मला कै० वा. म. जोशी ह्यांच्या 'इंदु काळे आणि सरला भोळे' ह्या कादंबरीवरून सुचली. अर्थात् हें फक्त 'वाङ्मयीन प्रकार' ह्यापुरतेंच ऋण आहे. कादंबरीची कल्पना माझी स्वतःचीच आहे. ह्या कादंबरींतील पात्रें आणि प्रसंग पूर्णपणें काल्पनिक आहेत. सत्यसृष्टींतहि अशीं पात्रें आढळणें शक्य आहे. प्रस्तुत कादंबरी लिहायला मला उत्तेजन दिल्याबद्दल मी माझे मित्र श्री० बाबुराव देवधर आणि माझे भाचे श्री. व. प्र. फणसळकर ह्यांचा अतिशय आभारी आहें.

विष्णु त्र्यंबक गर्दे

४३५/४ दुर्गानिवास,
ठळकवाडी, बेळगांव

# चंचला

अनुक्रम 29668
आ. वा.
क्र. 9850
नों. दि. 2

श्री

पुणें
१ सेप्टेंबर

प्रिय अरविंद,

आम्ही वेल्हेरला केव्हां येतों म्हणून तूं आमची अगदीं चातकाप्रमाणें वाट पाहात असशील. पण आकाशांत मेघ दिसण्यापूर्वींच पावसाची अपेक्षा करणाऱ्या चातकाला काय प्रायश्चित्त मिळतं, माहीत आहे का? वाट पाहाण्याचा दंड! दुसरं काय? नि असं बघ, मलासुद्धा खूप उत्कंठा लागली आहे तुला भेटण्याची. पण बाबांच्याऐवजीं काम करणारा दुसरा माणूस तर आला पाहिजे ना? हीं सारीं सरकारी कामं म्हटलीं, म्हणजे मला त्यांची भारी चीड येते. अगोदर आमचे बाबा रजाच मागत नाहींत. बरं मागितली, तरी ती सहसा मिळत नाहीं. नि रजा अगदीं मिळालीच, तर कामावर रुजू होणारा दुसरा माणूसच येत नाहीं. असं आहे हें आमच्या बाबांच्या रजेचं पुराण! तूं पुढें अगदीं खूप मोठा झालास, नि एकादी मोठी परीक्षा पास झालास, तरी सरकारी नोकरी केलेली मला नाहीं हो आवडणार मुळींसुद्धा! पण काय रे, मी इतकं लिहिलं, पण तुम्हांला आमची आठवण तरी होत असेल का कधीं काळीं? गेल्या सबंध आठवड्यांत मला एकदासुद्धा उचकी लागली नाहीं म्हणून विचारलं हो!

तूं Volley Ball का कायसं खेळायला जातोस ना? मी वेल्हेरला आल्यावर पाहायला येणार आहे, एका माणसाला कितपत येतं तें! पण माझी खात्री आहे, कीं मी आलें म्हणजे खूप घाबरगुंडी उडेल एका माणसाची. परवांच बाबांपाशीं हट्ट धरून मीं अंजिरी रंगाचं पातळ आणलं आहे. तें नेसल्यावर मी कशी दिसतें तें एकदा पाहा तर खरं!

पण आत्तांच उत्कंठा नको वाढायला. नाहींतर उद्यांपासून स्टेशनवरच येऊन बसशील तूं. नि तुला देण्याकरितां मी काय आणणार आहें, तें माहीत

आहे का ? तुम्हीं कधींही पाहिलें नसेल अशा रेशमाचा सुंदर नकशी असलेला रुमाल आहे तो. अगदीं चोळामोळा करून हातांत घेतला ना. म्हणजे रुईचा भुसभुशीत कापूस हातांत घेतल्यासारखं वाटतं नि असा रुमाल देणाऱ्या माणसाबद्दल पण आपलेपणा वाटतो, बरं का ?

खरंच, गेल्या आठ दिवसांत तुझं एकदासुद्धा कां पत्र आलं नाहीं ? वेल्हेरला काय पोस्ट–ऑफिस नाहीं वाटतं ? का तुझं नि पोस्टमास्तरचं बिनसलं आहे ? हो, तुझा स्वभाव पडला थट्टेखोर! आतां लौकर पत्र नाहीं आलं, तर आम्ही तुमच्या वेल्हेरला येणार नाहीं बरं का ?

घरांतील झाडून सर्व थोर मंडळींना नमस्कार सांग. आधीं त्यांना नमस्कार सांग. नाहींतर आधीं त्यांना झाडशील. मावशीला विसरूं नको हं. पाठवशील ना पत्र ? पाठव गडे. संपवूं इथेंच ?

चंचला

श्री

वेल्हेर,
३ सेप्टेंबर

प्रिय चंचला,

सरकारची पोस्टखात्याची व्यवस्था फार चोख आहे. निदान सध्या तरी तसं वाटतं. तेव्हां तूं मोठ्या आठवणीनें पोस्टाच्या पेटींत टाकलेलं पत्र मला पोंचलं हें सांगण्याची कांहीं आवश्यकता आहे का ?

पत्रांत प्रश्नचिन्हं तरी किती आहेत ! सुशिक्षित मुलींपुढें अलीकडे बरेच प्रश्न उभे असतात त्याचं चिन्ह वाटतं हें ? नि सारखं 'बरं का' कितीदा आलं आहे. एकाद्या कादंबरींत जर असं पत्र घातलं, तर टीकाकारांचं मस्तक भ्रमण करायला लागेल ना !

पत्रांत कितीतरी आठवणींच्या विजा चमकतात ! नि मग निराशेचा काळोख पसरतो. अशा वेळीं वाटतं, ह्या विजा उगीच कशाला चमकतात ? विजेपूर्वीचा काळोख काय वाईट असतो ? पण एकदा जलबिंदूंची भेट झाली म्हणजे फिटेल सारा संशय. तूं अंजिरी रंगाचं पातळ घेतलेलं कळलं. पण पातळांचा अंजिरी रंग कसा असतो तें मीं पाहिलं नसल्यानें तेवढ्यापुरतं अज्ञान कबूल

आहे मला. तुझ्या रेशमी रुमालाचं वर्णन वाचतां वाचतांच माझ्या अंगावर कुणा तरी रुईच्या कापसाचा अभिषेक करतंयूसं वाटतं आहे. तूं येणार म्हणून मी Volley Ball चं प्रॅक्टिस जोरांत सुरू केलं आहे. शिवाय संध्याकाळीं अगदींच करमेनासं झालं, म्हणजे नदीकाठच्या वाळवंटांत जरा आडवा होत असतों. परवां एकदा आभाळांत केवढं मोठं इंद्रधनुष्य दिसत होतं ! त्यांतील रंगांचा मिलाफ किती सुंदर होता ! मला वाटतं, स्त्री जातीची उत्पत्ति करूनसुद्धा ज्याच्या सौंदर्यसमीक्षक मनाची तृप्ति झाली नाहीं, अशा विधात्यानें आपल्या मनाची अतृप्त लालसा ह्या इंद्रधनुष्याच्या निर्मितीनें तृप्त करून घेतली असावी. मातींत खेळणारीं लहान मुलं ज्याप्रमाणें सहजासहजीं हवेंत माती उधळून देतात, त्याप्रमाणें जगाच्या रंगाऱ्यानें हवेंत हे सप्तरंग उधळून दिले असावेत. त्यावेळीं तूं जवळ असतीस म्हणजे खूप वर्णन करतां आलं असतं त्या इंद्रधनुष्याचं. पण तुला कुठें यावंसं वाटतं आहे लौकर ? पुण्याची फिरायला जायची टेकडी सोडून तुला गरिबाच्या फाटक्या कपड्यासारखी तुटक वाहाणारी वेल्हेरची नदी थोडीच आवडणार आहे ? आम्रवृक्षाचं सेवन करणारी कोकिळा, कडुनिंबाच्या झाडाकडे कशाला ढुंकून पाहाणार आहे ? आमचं वेल्हेर कांहीं तुमच्या पुण्याइतकं सुधारलेलं शहर नाहीं. मात्र सबंध गांवाची रचना अगदीं आंखल्यासारखी आहे. पुण्याला आलिंगन देणारे उंच पर्वत आमच्या वेल्हेरला मुळींच नसून भोंवतालच्या सपाट प्रदेशामुळें कुंपण नसलेल्या शेतासारखं आमचं वेल्हेर वाटतं. तूं इथें आल्यावर कुठें कुठें सफरी काढाव्यात ह्या विचारांत मी सध्या दंग आहें. तुमच्या सिंहगडच्या निम्म्यानें असणारा वेल्हेरचा किल्ला आपण पाहायला जाऊं. शिवाय इथें एक मोठा तलाव आहे, शंकराचं मंदिर आहे. खूप खूप मजा आहे इथें.

रोज तूं आज येणार नाहींस ह्या जाणीवेनें वेल्हेरची गाडी सारखे निश्वास सोडीत दुःखावेगामुळें अतिशय मंदगतीनें चालत असते.

येण्यापूर्वी पत्र टाकायला विसरायचं नाहीं बरं का ? मी कांहीं टांगेवाला नाहीं दररोज दोन वेळां स्टेशनवर यायला. आणखी खूप खूप लिहावंसं वाटतं. पण कुठें तरी संपवायचंच ना ? संपवूं ? संपवतों हं.

अरविंद

श्री

पुणें,

७ सप्टेंबर

प्रिय अरविंद,

पत्र पोंचतांच तुझ्या मनांत आनंदाच्या ऊर्मि उसळतील अशी आशा आहे. विद्युत्लहरींप्रमाणें मानसलहरींवर संदेश पाठवायची जर कुणा शास्त्रज्ञानें सोय शोधून काढली तर जगावर, त्यांतल्या त्यांत आम्हां तरुण-तरुणींवर त्याचे फारच उपकार होतील

अर्थात्, न लिहितांच, आम्हीं परवां वेल्हेरला येणार आहोंत हें तूं जाणलं असशीलच्च. नि काय आहेस रे ! वर्णन करतां करतां मला कोकिळेचीच उपमा दिलीस वाटतं ? काळी आहें वाटतं मी मुळीं तरी ? तुझं इंद्रधनुष्याचं वर्णन वाचून मला तर पुण्याच्या आभाळांतसुद्धा इंद्रधनुष्य उगवल्यासारखं वाटलं ! ही पण कला आहे वाटतं आपल्यांत ? आणि मी यायच्या आंत सफरीबरोबर आणखी कांहीं नाहीं ना ठरवून ठेवलंस ? वेदान्ती लोक मनाला सैरावैरा धावणाऱ्या अश्वाची उपमा देतात. ह्या अश्वावर आरूढ होऊन आपल्या प्रियजनांना भेटतां आलं असतं तर काय बहार झाली असती, नाहीं ? सध्या माझ्या मनांत विचारांची इतकी गर्दी झाली आहे, कीं तितकी गर्दी सध्या घरांत सामान बांधण्याची पण नसेल. तुमच्या खांडेकरांनीं हें कसं लिहिलं असतं, सांगूं ? 'मनाच्या आकाशांत विचारांचे ढग दाट जमून आले आहेत.' येते कीं नाहीं तुमच्या खांडेकरांची भाषाशैली बरोबर ? आगगाडींत पाय ठेवायला मन कोण उतावीळ झालं आहे. पण घड्याळाचे कांटे भरभर फिरविले म्हणून दिवस थोडाच जाणार आहे लौकर ? पाण्यांतल्या प्रतिबिंबाला दगड मारला म्हणून आकाशांतल्या चंद्राला थोडाच लागणार आहे तो !

तूं स्टेशनवर जरूर ये बरं का. बाकी तुला कशाला सांगायला हवं म्हणा ! तुझ्या पत्रावरून तें केव्हांच जाणलं आहे मी. कमळ फुलल्यावर सुवास थोडाच लपून राहाणार आहे ?

गाडींतून येतांना अंजिरी रंगाचं पातळ मी नेसून येत नाहीं बरं का ? नाहींतर भलत्याच रंगाच्या पातळाला पाहून हेंच का अंजिरी रंगाचं पातळ,

म्हणून म्हणशील आईदेखत. तुम्हां मुलांना पातळांचे सर्वच रंग उमजत नाहींत, म्हणून मीं हें लिहिलं आहे हो !

तुमच्या वेल्हेरचे टांगेवाले आमच्या पुण्याच्या टांगेवल्यांसारखे फसवीत नाहींत ना ? बाकी तूं बरोबर आहेसच म्हणा !

पण काय रे, तुमच्या वेल्हेरची गाडी फार हळू चालते होय ? आणि बाहेर तोंड काढलं, कीं कोळशाची धूळ ना ?

चंचला

श्री

पुणें,

१५ सेप्टेंबर

प्रिय चंचला,

वेल्हेरला पोंचून आठ दिवस झाले, पण तुला अजून पत्राची एक ओळ-सुद्धा नाहीं ना लिहवत ? बरोबरच आहे म्हणा ! तुझ्या त्या अरविंदच्या गोड सहवासांत तुला माझी आठवण तरी कशी होणार ? वेल्हेरसारखं टुमदार शहर पाहातां पाहातां पुण्याच्या ओबडधोबडपणाबद्दल तुला खूप चीड येत असेल, नाहीं ? नि पुण्याच्या मैत्रिणींचा पण खूपच कंटाळा आला असेल, नाहीं ?

पण तूं जरी मला विसरण्याचा खूप प्रयत्न केलास, तरी मी मात्र तुला मुळींच विसरणार नाहीं. चंचू सदैव माझीच मैत्रीण राहाणार. अरविंदांचा स्वभाव कसा काय आहे ? त्यांच्या पत्रावरून तरी ते अतिशय मोकळे असावेत असं वाटतं खरं. त्यांतून तूं पण अतिशय मनमोकळी. 'सरलयोः खलु सख्यमनारतम् ।' नाहीं का ? वेल्हेरच्या मुक्कामांत तुमची मैत्री खूप दृढ होणार एकूण !

पण चंचू, तुला तुझ्या आईचा स्वभाव नीट माहीत आहे ना ? तुझ्या मोकळेपणाच्या वागण्यानें आईच्या कपाळाला पडलेल्या आठ्या मोजलेल्या आहेस ना ? वृक्षाच्या बुंध्यावरील रेघांवरून ज्याप्रमाणें त्याचं वर्ष कळतं,

त्याप्रमाणें कपाळाच्या आठ्यांवरून माणसाच्या तिरस्काराचा पारा कळत असतो. तुझी मला त्या बाबतींत अतिशय भीति वाटते.

तुला माहीत आहे ना. कीं तुझ्यासारखीच कादंबऱ्या वाचून मी प्रेम करायला शिकलें होतें. पण विरुद्ध अनुभवानें मन मात्र कायमचं होरपळून निघालं. काव्य नि सत्यसृष्टि ह्यांचं त्रिळयाभोपळ्याएवढं सख्य असतं. कवीच्या सृष्टींत तारे, ग्रह, नक्षत्रमाला ह्यांचं कोण माहात्म्य असतं ! पण त्यांच्यांतील एकाद दुसरा ग्रह जरी पृथ्वीवर तुटून पडला, तरी साऱ्या पृथ्वीचा नाश करून टाकील, ह्याचा कधीं कुणी विचार तरी केलेला आहे का ?

आकाशांत विजा चमकतांना पाहून कवीला कोण हर्ष होतो ! पण त्यांतील एकादीच कवीच्या नुसती जवळून गेली, तरी विजेला पाहून हर्षभरित होणाऱ्या प्रतिभेची दांतखीळ बसल्याशिवाय राहाणार नाहीं. काव्यसृष्टींत चकोर पक्ष्यांच्या विरहाला साधं झाडाचं पानसुद्धा पुरत, पण सत्यसृष्टींत मात्र पत्नीचा विरह सहन न होऊन दोरी म्हणून सापाचा उपयोग करणारे तुलसीदास दृष्टीस पडतात. कविकल्पनेप्रमाणें चातक हा मेघांच्या पाण्याशिवाय दुसरं पाणीच पीत नाहीं. पण चातकांपेक्षां अधिक जाणत्या अशा नायकांत, सार्वजनिक नळावर पाणी भरण्याकरतां जी कांहीं भांडाभांडी चालू असते ती पाहिली, कीं काव्यसृष्टि नि व्यवहारसृष्टि ह्यांतील फरक अधिकच जाणवतो. काव्यसृष्टीचं कमळ हें कितीही सुंदर नि सुवासिक असलं, तरी तें व्यवहारसृष्टीच्या चिखलांतच जन्माला आलेलं असतं. कादंबऱ्यांतील प्रणयी नायकनायिका, एकदा ताटातूट झाली, तरी कादंबरीच्या शेवटापर्यंत एकमेकांना कित्येकदा भेटूं शकतात. पण व्यवहारांत एकदा का ताटातूट झाली, कीं आयुष्याच्या शेवटापर्यंत प्रेममय भेटच होऊं शकत नाहीं. विधात्याचं मानवी आयुष्याची कादंबरी रेखाटण्याचं शास्त्र, मानवी कादंबरीकारापेक्षां अगदींच वेगळं आहे. त्यांत 'कलेकरतां केली' म्हणून कलाहीन जीवितही रंगवलेलं नसतं, अगर 'जीवनाकरतां कला' म्हणून कलात्मक निष्क्रियता पण नसते.

आयुष्य हें अनुभव नि अनुमान ह्यांनीं भरलेलं असतं. जे जे अनुभवाला अवमानून अनुमानाचं बोट धरून चालतात, त्यांच्या त्यांच्या वाट्याला अपयश येतं. कल्पनेच्या आकाशांत मन रंगून गेलं असतांना व्यवहाराच्या

दगडावर कितीतरी ठेचा लागतात मनुष्याला ! पण हे ठेच देणारे दगड जसे अनेक आहेत, तसंच कल्पनेचं आकाश पण अनंत असतं, नि म्हणूनच दुःखाची मालिका अखंड चालू आहे. तुला माझं लिहिणं कदाचित् कठोर वाटेल. पण जीवितनौकेला मार्ग दाखविणारे उपदेशाचे दीपस्तंभ हे कठोरपणाच्या खडकावरच उभारलेले असतात. मी एका विशिष्ट दुर्बिणींतून जगाकडे पाहात्यें असं पण तूं म्हणशील. पश्चात्तापाच्या कठोर काजळानें काळी झालेली मनाची कांचही असेल ती एकादी. पण प्रणयानें मनुष्याच्या आयुष्याचं मातेरं होत नाहीं असं तरी मी कशी म्हणूं ? अंधःकाराच्या मांडीवर बसून मी गाळलेले अश्रु वाळलेही नसतील. चांदण्याची शोभा पाहून कवींना आनंद वाटत असेल, पण मला मात्र ती शोभा अमावास्येच्या काळोख्या रात्रीहून अधिक भयप्रद वाटते.

समुद्राला ओहोटी लागली तरी लागलीच भरतीची अपेक्षा तरी असते. पण प्रणयांत अपेशी ठरलेल्यांच्या आयुष्याची ओहोटी उतरतच नाहीं कधीं. उन्हाळ्यात वेलींचीं फुलं गळून पडलीं, तरी पावसाळ्यांत कोण बहर येतो ! पण खऱ्या प्रीतीच्या वेलीला एकदाच फूल येत असतं. नि तेंसुद्धा जर गळून पडलं तर कितीही प्रयत्नाचं पाणी घातलं, तरी त्या वेलीला परत फूलच येत नाहीं. तांब्यांच्या 'मरणांत खरोखर जग जगतें' ह्या ओळीची मला अशा वेळीं फार आठवण होते. असो. तुझ्या तेथील आनंदी जीवनाला माझ्या दुःखाची झळ तरी लागूं नये.

पण खूप खूप मोठं पत्र पाठवशील ना चंचू ! अगदीं तुझ्या पत्राकडे मी डोळे लावून बसलें आहे. पाठव बरं का पत्र. ल. आ. मो. न.

प्रेमा

श्री

वेल्हेर,
१८ सेप्टेंबर

प्रिय प्रेमा,

तुझं उपदेशामृत पोंचलं. दादासारख्या क्षुल्लक माणसाकरितां तूं इतकी

झुरत्येस हें पाहून खरोखर आश्चर्य वाटतं. चालतां चालतां दगडाची ठेच लागली तर तो दगड बाजूला काढून टाकावा. पुन्हा दुसरा दगड दिसला, कीं ठेच लागणार नाहीं अशी काळजी घ्यावी. पण म्हणून काय चालणंच बंद करायचं? जिथं रस्ता आहे तिथं दगड हे असायचेच. तारुण्य हें जीविताच्या पाकळ्या प्रफुल्लित करण्याकरितां असतं, त्या कायमच्या मिटून घरण्याकरितां नव्हे. टेकडीवर बसणाऱ्या म्हाताऱ्याच्या गप्पा ऐकल्या नाहींस तूं? ते आयुष्याच्या संध्यासमयीं जीविताच्या उंबरठ्याच्या कडेवर बसून निराशेचे निश्वास सोडीत असतात. पण तीच तरुण मंडळी पाहा. ढगांच्या सोनेरी कडांनीं, पश्चिमेच्या गुलाबी गालांनीं, रंगीत पक्ष्यांनीं, त्यांची आशा नटलेली असते. कुणी परदेशगमनाच्या गोष्टी बोलतो, तर कुणी ध्येयाची लांबी रुंदी मोजतो. किती स्वच्छंदी मनानें वागडतात हीं फुलपांखरं! पण तेच म्हातारे पाहा. त्यांच्या साऱ्या आयुष्याची अमावास्या झालेली असते. कर्ज मागायला गेलेल्या भय्यासारखे ते मृत्यूच्या दाराशीं ठाण मांडून बसलेले असतात. पान पिकलं म्हणजे तें खालीं लवून जमिनीकडे बघत असतं. पण तींच हिरवीं पानं पाहा, किती आनंदी असतात! तारुण्य हें आयुष्याच्या वाळवंटातील बागबगीचा आहे. किती रंगीबेरंगी फुलांनीं नटलेला असतो हा बागबगीचा! नाना रंगांचीं हीं फुलपांखरं कोण धावपळ करीत असतात. वायूला फुलांपानांशीं बोलायला फुरसत पण नाहीं. हे आकाशांतले मेघ कोण घाईत आहेत! त्यांना आलिंगन द्यायला उत्सुक असलेले हे पर्वत निराशेनें कितीतरी काळे पडले आहेत. तरी त्या मेघांना कुठें पर्वा आहे त्यांची? ही सारी धावपळ, चढाओढ विनाशाप्रतच चालली नाहीं काय? पण ह्या धाव-पळींतून, ह्या चढाओढींतूनच आनंद निर्माण होतो.

वेल्हेरला येतांना खंडाळ्याच्या घाटांत आम्हांला खूप पाऊस लागला. त्यामुळें डोंगराच्या शिखरावरून वाहाणारं पाणी, हजारों हांडे उपडे करून सांडलेल्या दुधासारखं दिसत होतं. समोरचे पर्वत तर भस्माचे पट्टे ओढून ध्यानस्थ बसलेल्या योग्यांसारखे दिसत होते. क्वचित् ठिकाणीं ह्या काळया-कुट्ट पर्वतांवर कुणी तरी रेघोट्या ओढल्यासारखं दिसत होतं.

अरविंदच्या सहवासांत माझे दिवस अतिशय आनंदांत जात आहेत.

पण त्याचबरोबर पुण्याला यायचे दिवस पण थोडेच राहिले आहेत ही जाणीव उत्पन्न झाली आहे.

अरविंद हा आमच्या मावशीचा पुतण्या. पण त्याच्याबरोबर मी कुठें बाहेर पडायचं म्हटलं, कीं आईच्या कपाळाला आठ्या पडल्याच. खरंच प्रेमा, मनमोकळया माणसाबरोबर फिरायला जाण्यांत कसले पाप आहे! आमच्या समाजाच्या नीति-अनीतीच्या कल्पना ह्या निव्वळ मनाच्या कमकुवत-पणावर उभारलेल्या आहेत. पुरुष स्त्रियांशीं असभ्य रीतीनें वागतात ह्याच खरं कारण म्हणजे त्यांना स्त्रियांत मनमोकळेपणानं मिसळायला मिळालेलं नसतं.

परवां आम्हीं एका बागेंत जायचं ठरवलं. मावशी म्हणाली, 'तिथं मवाली फार आहेत.' कुठं दुसरीकडे जायचं म्हटलं, कीं अंधार होईल म्हणून भीति दाखवायची.

शेवटीं अरविंद तर परवां वैतागून म्हणाला, 'चंचू, कशाला आलीस उगीच तूं असल्या घरांत?' अरविंदला आईबाप नाहींत. मावशी त्याला किती तुसडेपणानें वागवते तें तो मला सर्व कांहीं परवां सांगत होता.

त्याला तरी बिचाऱ्याला माझ्याशिवाय दुसरं कोण मायेचं माणूस आहे? खडक कितीही कठीण असला, तरी तो कुठें ना कुठें तरी झिरपतोच. जगांत दुःखाला तोंड देणाऱ्या माणसाचीही नाहीं का अशीच स्थिति होत? मग सदोदित दुःखांनीं पिळून निघणाऱ्या अरविंदला जर माझ्याविषयीं आपलेपणा वाटला तर त्यांत काय वावगं आहे? आणि मला तरी त्याच्याविषयीं कां परकेपणा वाटावा? दादाची मी पाठची बहीण. सबंध आयुष्यांत एकदा तरी दादा माझ्याशीं माया लावून बोलला आहे का? रस्त्यावरच्या कुत्र्याच्या अंगावरून ममतेनें हात फिरवला तर तेंसुद्धा आपले पाय चाटूं लागतं. मग आपण तर माणसं. आईला तर मी सुशिक्षित म्हणून ओझं झालेली, गळ्यांतली घोरपड. मग अशा स्थितींत माझं मन अरविंदकडे धाव घेऊं लागलं तर त्यांत काय चूक आहे? पाण्याला उताराकडे धाव घ्यायला सांगावं का लागतं? तो त्याचा उपजत धर्मच असतो. मी पुण्याला जाणार म्हणून अरविंदला कोण वाईट वाटत असतं! मी पुण्याला जायची गोष्ट काढली, कीं

त्याची मुद्रा अतिशय केविलवाणी होते. प्रेमा, जग हें असं कांहीं विचित्र आहे, कीं जिथं जन्मभर एकमेकाच्या सहवास लाभून एकमेकाविषयीं यत्किंचितही प्रेमाचा उमाळा फुटत नाहीं आणि नाहीं तिथें क्षणाच्या सहवासानें-सुद्धा प्रेमसागराला अथांग भरती येते.

जग म्हणजे परस्पर विरुद्ध गोष्टींनीं भरलेलं प्रदर्शन. असो. आम्ही लौकरच पुण्याला येणार आहोंत. अरविंदला सोडून यायचं अगदीं जिवावर आलं आहे. पण व्यवहारात मन कठोर करावंच लागतं, नाहीं ?

चंचला

श्री

वेल्हेर,
२२ सेप्टेंबर

प्रिय चंचला,

तुला स्टेशनवर पोंचवून मी घराकडे यायला निघालों, पण रस्ता किती लांबच लांब आणि न संपणारा वाटत होता ! वाटेंतलं तें रस्त्याच्या दुतर्फा लागलेलं कांटेरी कुंपण–हिंवाळा संपून उन्हाळा लागला आणि झाडाझुडपांचीं पानं गळलीं तरी त्या कुंपणाला थोडीच त्याची खंत वाटणार आहे ! ज्या ज्या मानवी मनांचे निराशेचें कांटे बाहेर फुटून निघालेले आहेत त्यांनीं तरी कशाला खंत बाळगावी ह्या जगांतील धकाधकीची ? पण तसं नाहीं होत चंचला ! मन हें एक सुखदुःखांच्या लाटांवर हेलकावे खाणारं जहाज आहे.

तूं इथें असतांना किती आनंदांत माझे दिवस गेले. पण आपल्या परिचयाची पाऊलवाट एकाद्या राजमार्गाला मिळणार आहे, कीं रानोमाळच्या पाऊलवाटेप्रमाणें पुसट पुसट होत जाऊन ......? पण नको. वैरी चिंतीत नाहीं तेंसुद्धा एकादवेळीं मन चिंतीत असतं. तूं वेल्हेरला असतांना वेल्हेरचा प्रत्येक भाग म्हणजे स्फूर्तीचा जिवंत झराच वाटत होता मला. पण तोच आतां अतिशय भकास भासूं लागला आहे. संध्याकाळीं फॅक्टरीच्या बाजूला न जातां मी हल्लीं नदीकांठीं फिरायला जात असतों. पण ओसाड पुलावरून खालीं

पडणारा तो धबधबा, तीं मारवाड्यांचीं बेसूर गाणीं आणि लांबच लांब पसरलेलं तें वालुकामैदान, ह्यांमुळें माझं मन अगदीं विषण्ण होऊन जातें. लहान लहान मुलं वाळूंत बसून किल्ले करीत असतात. पण जरा कुठें धक्का लागला, कीं ते किल्ले सर्वच्या सर्व ढासळून पडतात. पण त्या लहान मुलांना तरी हसण्यांत काय अर्थ आहे ? आयुष्याच्या वाळवंटांत आपण मोठीं मोठीं माणसंसुद्धा असेच आशाआकांक्षांचे किल्ले नसतों का नेहमीं उठवीत ?

किती क्षणभंगुर असतात ते !

तसाच तो चिवडेवाला. नदीच्या कांठाकांठानें गाणं म्हणत म्हणत चिवडा विकत असतो. कुणी त्याचा चिवडा घ्या अगर न घ्या, तो आपल्या गाण्याच्याच तंद्रींत. किती सुखी प्राणी आहे तो ! गाणं म्हणून म्हणून दमला, कीं घरीं जाऊन स्वस्थपणें झोप घेईल. कांहीं चिंता तरी आहे का त्याला ? हा देवळाजवळचा वटवृक्ष संथपणें डोलत असतो. एखादी वायूची झुळुक आली, कीं कांण हुशारी वाटते मनाला ! देवळांतल्या विहिरीचं पाणी प्यायलं, कीं तहान शांत होते. पण मन शांत नसलेल्या माणसाला कुठली शांतता मिळणार असल्या विहिरीच्या पाण्यानें ? गुडघ्याला उपरणं बांधून वृद्ध माणसं स्वस्थपणानें कठड्यावर बसून असतात. तरुण मुलं मात्र भावी आयुष्याचीं कल्पनाचित्रं रंगवण्यांत गर्क झालेलीं असतात. एकाला ललामभूत भूतकाळ आहे तर दुसऱ्याला आशादायी भविष्यकाळ आहे. पण मी मात्र वर्तमानाच्या निष्क्रिय सरहद्दीवरच रेंगाळत पडलों आहें.

सूर्याचं स्वागत करण्याकरितां नटून सजून बसलेली पश्चिम लाजेनें किती तरी लाल झाली आहे ! आणि करीन ती पूर्व म्हणणारी पूर्व दिशा आतां निराशेनें आणि द्वेषानें काळी ठिक्कर पडली आहे. आकाशांत पक्ष्यांचे थवेच्या थवे किती स्वच्छंदानें विहार करीत आहेत ! तसंच, वृक्षावर बसलेलं तें पक्ष्यांचं एक जोडपं. किती आनंदानें एकमेकांशीं गप्पागोष्टी चालल्या आहेत ! वडीलधाऱ्यांचा धाक, सामाजिक बरेवाईटपणा, कांहींतरी अडचणी आहेत त्यांच्या मार्गात ? परस्परांचा वाङ्निश्चय तर चालला नसेल हा ? आर्थिक विषमता, सामाजिक दर्जा, स्वकुलाचा बडेजाव, मानमरातब, जाती–जातींतील उच्चनीचता आणि कीर्तीची हाव ह्यांतील एक तरी विघ्न उभं राहील का त्यांच्या

मार्गीत ? पुष्कळदा विचार करायला लागलों, कीं मला असा प्रश्न पडतो, कीं मनुष्य हा पशूंतून उत्क्रांत झालेली जात आहे, कीं अपक्रांत ?

पुन्हा भेट होईल का आपली ? तुझ्या आईचा स्वभाव, माझ्या आई-बापाचा अभाव आणि आपल्या परस्परांत जागृत झालेला भाव लक्षात घेतला, कीं मनाला निराशेची निशा चढते. कल्पनेचा पतंग आकाशात कितीही उंच उडाला तरी दैवाची दोरी त्याला केव्हां खालीं ओढील ह्याचा कांहीं नेम असतो का ?

दैव माणसाशीं नेहमीं उंदीर-मांजराचा खेळ खेळत असतं. उंदराला बागडायला चारी दिशा मोकळ्या वाटतात. पण पाठीशीं असलेलं मांजरच त्याची खरी दिशा ठरवीत असतं. तुझ्या पत्राची अतिशय आतुरतेनें मी वाट पाहात आहें.

अरविंद

श्री

पुणें,

२४ सेप्टेंबर

प्रिय अरविंद,

तुझं चंचूला आलेलं पत्र माझ्या अवलोकनांत आलं. आठ दहा दिवसांचा परिचय इथपर्यंत येईल असं मला मुळींच वाटलं नव्हतं. तुझ्यासारख्या मुलांना मुलींत मिसळूं द्यायचा अवकाश, तुम्ही आपल्या वळणावर जायला मुळींच वेळ लागत नाहीं. असलीं घाणेरडीं पत्रं लिहितांना तुम्हांला सारासार विचार तरी राहात असतो का ? चंचूच्या आईचा स्वभाव तुला माहीत नाहीं होय ? आईचा प्रश्न बाजूलाच राहिला, पण मलासुद्धा असले चाळे मुळींच खपणार नाहींत. मावशीच्या घरांत तुझी किंमत किती आहे तें मी पुरेपूर जाणून आहें. मावशीच्या घरचा एक साधा वारकरी तूं! वारकऱ्यानें आपल्या मर्यादा मुळींच सोडूं नयेत बरं का ? नाहींतर आयतं खायला मिळतं तें पण मिळणार नाहीं. पत्रांतल्या आचरट उपमा वाचून हसावं कीं रडावं हेंच कळत नाहीं. चंचूवाचून तुला काय अलीकडे मुळींच करमत नाहीं, होय ? घराबाहेर पडून

भाकरीच्या तुकड्याकरितां वणवण फिरावं लागलं, म्हणजे कळेल कसं काय कमतं तें. चाकरानें धन्याचा पोषाख चढवून पाहूं नये. ज्याला आपली परिस्थिति काय आहे, आपण कुणाच्या मैत्रीची अपेक्षा करीत आहोंत, ह्याचा सारासार विचार राहात नाहीं, अशीं माणसं स्वतःचा नाश करून घेतल्यावाचून मुळींच राहाणार नाहींत. वास्तविक मी ह्या गोष्टी तुला न कळवतां मावशीलाच कळवणार होतों. पण म्हटलं, एकादा मनुष्य एकादी गोष्ट भावनेच्या भरांत करीत असला तर त्याला त्याच्या चुकीची जाणीव करून द्यावी. मग त्यानें सुधारणा केली तर ठीकच झालं. तूं सुधारणा केलीस तर बरं. नाहींपेक्षां मला माझा मार्ग मोकळा आहे. सूज्ञांस अधिक सांगणें नलगे.

प्रणयाच्या नादीं लागून चांगल्या चांगल्या माणसांनीं आपल्या मूर्खपणाचं प्रदर्शन केलेलं आहे. तुझं पत्र वाचून मला त्याच गोष्टीची खात्री पटलेली आहे. तूं कांटेरी कुंपणावर केवढं वक्तव्य केलं आहेस! मी वेल्हेरला पुष्कळदा आलों. पण माझं तिकडे लक्षसुद्धा गेलं नाहीं. मी जर कधीं काळीं दुःखांत सांपडलों, तर तुझ्यासारखा वाळवंटांत आडवा होऊन आकाशाकडे शून्य मनानें बघण्यापेक्षां, तुझ्या त्या चिवडेवाल्याकडून चिवडा विकत घेऊन तो खात खात वेळ काढीन.

वडाचं झाड हाललं, करा त्याच्यावर कल्पना. पक्ष्यांचं जोडपं झाडावर बसलं, दे त्याला उपमा. अरे, काय आहे तरी काय! वारा सुटला तर काय त्या वडाच्या झाडानें हालूंसुद्धा नये! आणि सहज कंटाळा आला असेल म्हणून तें जोडपं कशावरून वृक्षावर बसलं नसेल?

दादा

श्री

वेल्हेर,
२७ सेप्टेंबर

प्रिय दादा,

आपलं शिष्टपणाचा पोकळ आव आणणारं पत्र मिळालं. त्यांत मनाची लाजसुद्धा गुंडाळून ठेवल्याचं अगदीं नीट दिसून आलं. आपले वडील

मिळवते आहेत म्हणून हे थेर सुचत आहेत आपल्याला. मूर्ख माणसा, निव्वळ परिस्थितीनें दरिद्री बनलेल्या मला डिवचतांना तुला मुळींच शरम वाटली नाहीं? प्रेमा नावाच्या मुलीला नादीं लावून आंगांत धैर्य नसल्यानें तिला झिडकारतांना अक्कल कुठें गेली होती? दुसऱ्याला उपदेश करतांना सारेच पंडित असतात. पण स्वतःच्या पायांखालीं काय जळत आहे तें अगोदर पाहावं.

आज तुझी परिस्थिति नीट-नेटकी आहे. पण उद्यां ती बिघडणार नाहीं हें तरी कशावरून? जगांत साम्राज्यंच्या साम्राज्यं उत्पन्न होत असतात आणि लयाला पण जात असतात. तिथें तुझ्यासारख्याची पोकळ घमेंड कुठवर टिकाव धरणार? ह्या अवाढव्य जगांत तुझ्यासारख्याची पोकळ घमेंड म्हणजे निव्वळ एक साधा बुडबुडा.

प्रिय दादा, मनुष्य परिस्थितीनें जर्जर झाला म्हणजे तो हातीं लागेल त्या साधनाला धरून परिस्थितीच्या गर्तेतून वर यायचा प्रयत्न करीत असतो. पण तुझ्यासारखंच मला मन आहे, भावना आहेत, ही गोष्ट तूं विसरलास. मनुष्य ऐश्वर्याच्या धुंदींत असला म्हणजे आपल्या पायांखालीं काय तुडवलं जात आहे इकडे त्याचं लक्ष नसतं. पण विश्वाचा कायदा मोठा कठोर असतो. जें पायदळीं तुडवलं जातं, तेंच प्रसंगीं डोक्यावरही घ्यावं लागतं. ज्याच्या मानेवर पाय दिला जातो, त्याच्यापुढेंच मान पण वाकवावी लागते. ह्याउप्पर तरी राग नसावा.

अरविंद

श्री

पुणें,
२७ सेप्टेंबर

प्रिय अरविंद,

तुझं पत्र पोंचलं. पण तें चुकून माझ्या पुस्तकांत राहिलं आणि तें दादाच्या अवलोकनांत आलं. दादा खूप चरफडला माझ्यावर. नाहीं नाहीं त्या धमक्या दिल्या, मावशीला कळवतों म्हणून म्हणाला. त्यानं जर तुला कांहीं रागावून लिहिलं असलं तर क्षमा करशील ना मला? कित्येक वेळा साध्यासुध्या चुकांतून किती गंभीर परिस्थिति निर्माण होत असते, नाहीं? खरंच, करशील ना क्षमा?

किती विचित्र लिहिलं आहेस रे पत्र तूं! मी तें कितीदा वाचलं तरी त्याचा कांहीं अर्थच लागेना बाबा! ह्याच्या पूर्वीचीं पत्रं कशीं छान लिहीत होतास. किती सोपीं, सहज आणि सुंदर होतीं तीं! तुम्ही मुलगे आम्हांला पत्रं लिहितां, तेव्हां आम्हांला काय अगदीं साहित्यिक किंवा पंडित समजतां का रे? इतकं भारदस्त, अलंकारिक आणि गोंधळ उत्पन्न करणारं पत्र एखाद्या मासिकाकडे पाठवायचं, कीं आम्हां मुलींना पाठवून अधिकच गोंधळांत पाडायचं?

लौकरच तुझ्या पत्राचा अर्थ लावणाऱ्या माणसाला बक्षीस लावणार आहे बरं का? हो, पण रागावला नाहींस ना? तुझी प्रकृति सांभाळायचं मोठं जिवावर येतं बाई. पुढें एखादी चांगली बायको मिळाली तर बरं, नाहींतर हा रोगी सारखा अस्वस्थ व्हायचा. एखादी पाहून ठेवली नाहींस ना आत्तां-पासून? असली तर सांग आपलं, म्हणजे थट्टा करायला बरं पडेल आमच्या वहिनीची. राग येत नाहीं ना थट्टेचा? नाहींतर बसशील वाळवंटांत अश्रु गाळीत. आणि ह्या पत्रांत आकाशांतील चित्रविचित्र रंगांचं वर्णन नाहीं केलंस तें? कीं तुमच्या वेल्हेरचं आकाश अलीकडे ढगांनींच व्यापून टाकलं आहे? पुढच्या पत्रांत वडाचं झाड कितीदा हाललं तें जरूर लिहून कळव बरं का? विसरणार नाहींस ना? तुम्हांला अलीकडे आमच्यावांचून करमत नाहीं म्हणे! दुसऱ्या कुणाची थट्टा करायला मिळत नसेल, नाहीं? करमत नसेल तर पुण्याला ये कीं, म्हणजे मावशीच्या त्रासांतून तरी सुटशील कांहीं दिवस. मावशी आमच्याशीं तर किती तरी प्रेमानें वागते. मग तुझ्याच बाबतींत असा हेवादावा कां बरं? आईबाप वारलेल्या मुलाचं आयुष्य किती खडतर असतं, नाहीं? अरू, तूं कसे दिवस काढतोस रे त्या दुःखाच्या खाईंत? मला तर एक क्षणभरसुद्धा चैन पडलं नसतं त्या तसल्या भकास घरांत. मावशीला मुळीं अंतःकरणच नाहीं. काय फडाफडा बोलत असते तुला. काकासाहेबांना माहीत आहे का रे तिचं असलं वागणं? बाकी पुरुषांचं कुठें लक्ष असतं असल्या बाबतींत म्हणा! अरे खरंच, तुला एक सांगायचं विसरलेंच. मी प्रेमा, प्रेमा म्हणून माझी मैत्रीण म्हणत होतें ना? तिच्या वडिलांची नेमकी वेल्हेरला बदली झाली आहे. दादानें तिला भारी वाईट वागवलं आहे. तूं तिच्याशीं

जरूर ओळख काढ बरं का. मी तिला, तूं मला लिहिलेलीं सर्व पत्रं दाखविलीं आहेत. माझी अगदीं जिवलग मैत्रीण आहे बरं का ती ! आतां तुला करमायला बरं होईल. तिला तुझ्या परिस्थितीमुळें तुझ्याविषयीं अतिशय सहानुभूति वाटते.

तूं आमच्याकडे येशील का कांहीं दिवस ? आईला सांगूं मी तुला इकडे बोलवायला ? तेवढीच तुझ्या दुःखाची झळ तरी कमी होईल. येशील का तूं आमच्याकडे ? जरूर जरूर आलं पाहिजे बरं का ?

चंचला

श्री

वेल्हेर,
४ ऑक्टोबर

प्रिय चंचला,

आम्ही सर्व मंडळी कधींच इथें येऊन सुखरूप पोंचलों. बाकी वेल्हेर गांव मोठं छान आहे हो ! अगदीं फूटपट्टीनें आंखल्यासारखं वाटतं. पण पुण्याच्या मानानें बराच शुकशुकाट वाटतो.

बाकी खेडेगांवच्या लोकांनासुद्धा मुंबईसारख्या शहरांत गेलं म्हणजे चुकल्यासारखं वाटतं. अवतींभवतीं डोंगर नसल्याकारणानें गांव मला बरंच उजाड वाटतं. शिवाय पुण्याची नेहमीं टेकडीवर फिरण्याची हौस पण फेडतां येत नाहीं. पुण्याच्या टेकड्यांचं महत्त्व इथें आल्यावरच पटतं. इथें ओळखीचे असे म्हणजे एकटे अरविंदच. तुझ्या मावशीचं आणि माझं अलीकडे बरंच सूत जमलं आहे. हीच बाई अरविंदाचा तसा छळवाद मांडीत असेल असं वाटत पण नाहीं. बाकी बोटं भाजल्याखेरीज थोडाच राखेंतला अग्नि प्रत्ययाला येत असतो ?

तुझ्या अरविंदांची खूप खूप विनवणी केली म्हणजे ते फिरायला येतात. तूं तर म्हणत होतीस, कीं ते अतिशय मनमोकळे आहेत म्हणून. पण इथें प्रकार पाहावा तो वेगळाच. तुझा विषय निघाला म्हणजे काय थोडंफार

बोलतील, तेवढाच आमचा फिरायच्या वेळचा गप्पाविनोद. बाकी जें कांहीं थोडंफार बोलतील त्याच्यांत बुद्धिमत्तेची चमक घटकोघटकीं प्रत्ययाला येत असते. नशीब आहे बाई तुझं त्यांचीं लांबलांब संभाषणं ऐकण्याचं ! आम्हांला द्या ना तुमच्या नशिबाचा थोडासासा वांटा. माझ्याविषयीं त्यांना सहानुभूति मात्र भलतीच वाटते. तूं कांहीं सांगून ठेवलं आहेस वाटतं माझ्याविषयीं ? माणसानें आपल्या मित्रांपासून सावध असावं म्हणतात, तें कांहीं खोटं नाहीं. आलं का सारं लक्षांत ? अशा गोष्टी सांगत असतात वाटतं दुसऱ्याला ? अरविंद मात्र हीन परिस्थितीच्या उकिरड्यावर पडलेलं एक रत्न आहे. जगाला थोडीच अशा रत्नांची पारख होणार आहे ! लोक रत्नांची पारख रत्नांवरून करीत नसून, तीं ठेवायच्या पेटीवरून त्यांची पारख होत असते. चंचू, ह्या जगांत दारिद्र्य, हीन कुलांतील जन्म आणि परिस्थितीचा कडवटपणा ह्यांमुळें किती तरी माणसं वायां जात असतील ! आमच्या दादांकडे गिरणींतल्या मजुरांचीं मुलं मदत मागायला येत असत. किती चलाख आणि हुशार असत तीं ! ह्या मुलांच्या बुद्धिमत्तेवर घरादारांतल्या संस्कारांचा गंज चढलेला असतो, पण घांसून पुसून तो साफ करायला आहे का कुणी तयार ? पाऊस पडला काय, न पडला काय, सागराला थोडीच काळजी असते त्याची ? आमचा समाज पण राष्ट्राच्या ह्या वैभवाविषयीं असाच निष्काळजी आहे. अय्या ! समाजसत्तावादावर व्याख्यानच द्यायला लागलें कीं मी ! अजून तर रशियाचा इतिहाससुद्धा वाचलेला नाहीं. बाकी हल्लीं समाजसत्तावादी व्हायला अभ्यासाची कुठें जरुरी असते म्हणा ! कांहीं दिवसांनीं जातीप्रमाणें, लोकांचे राजकीय पंथ पण जन्मल्याबरोबरच ठरूं लागतील. हल्लींसुद्धा नाहीं का, दहा दहा वर्षांचीं पोरें पक्षनिष्ठ घोषणा करीत ? तुला हसूं नाहीं येत असल्या थेरांचं ? तुझ्या दादाला आठवण तरी होते का माझी ? आतां कशाला होईल म्हणा ! इंग्लंडच्या हवेप्रमाणें पुरुष जातीचं मन हें क्षणाक्षणाला पालटत असतं. तुला हल्लीं पुण्याला अरविंदवांचून कितपत करमतं ? सारखं मन वेल्हेरला धाव घेत असेल. पाण्याला उताराकडे धाव घ्यायला सांगायला थोडंच लागतं ? तो त्याचा उपजत धर्मच असतो, नाहीं का ? बरं, आतां पत्र पुरें करतें बाई !

प्रेमा

श्री

पुणें,

८ ऑक्टोबर

प्रिय अरविंद,

परवांच मला प्रेमाचं पत्र आलं. त्यांतील तुझ्याविषयींचा मजकूर वाचून अतिशय वाईट वाटलं. तूं अलीकडे असा खिन्न कां असतोस? माणसानें कसं आनंदित असावं. मनुष्य दुःखांचीं प्रेतं उकरून काढायला लागला, तर त्याला रडायला सारं आयुष्यसुद्धा पुरायचं नाहीं. क्षणाक्षणाला आपल्या आयुष्याची वाफ होऊन जात असते. अशा स्थितींत मनुष्यानें दुःखांकडे पाठ करून सर्व आयुष्य कंठलं पाहिजे. एका इंग्रजी लेखकानें म्हटल्याचं मला स्मरतं, कीं 'आयुष्यांत आपण जितके तास आनंदांत घालवीत असतों, तितकेच तास आपण वास्तविक जगलेलों असतों.' किती सुंदर तत्त्व सांगितलेलं आहे 'त्यानें! मनुष्यानें आपलं दुःख विसरावं म्हणून परमेश्वरानें केवढं मोठं अफाट विश्व निर्माण केलेलं आहे! त्या जगाच्या रंगाऱ्यानें आपल्या कुंचल्यानें ह्या आकाशाच्या छताला कितीतरी चित्रविचित्र रंग दिलेले आहेत! रंग देतां देतां रंगाचे जे ओघळ खालीं पडतात त्यांत हे विविध पक्षी, हीं फुलं न्हाऊन निघाल्यानें त्यांच्यांतही रंगांची नयनमनोहर विविधता उत्पन्न झालेली आहे. कोकिळेचे मधुर आलाप, बुलबुलाची तल्लीनता, आपल्या नादमाधुर्यावर साऱ्या विश्वाला झुलवित असते. क्षणाक्षणाला नाना रंगांचीं पातळं परिधान करणारी ही पृथ्वी, आपल्या रसिकतेनें एकाद्या महाराणीला पण मागें टाकील. कुबेर तर आपल्या संपदेचं उघडं नागडं प्रदर्शन आकाशाच्या अंगणांत, रात्रीच्या वेळीं मांडून बसलेला असतो. किती लुकलुकतात हे तारे!

मावशी तुला कांहीं टाकून तर बोलली नाहीं ना? किती कठोर आहे मावशीचं अंतःकरण! कांहीं कांहीं माणसांच्या शरीरांत, हृदयाला रक्ताचं अभिसरण करण्याशिवाय दुसरं कार्यच नसतं म्हणे! रस्ते बांधून तयार झाले म्हणजे खुणेचे मैलाचे दगड पण ठरवून ठेवलेले असतात. आपल्या आयुष्याचं मातेरं करणारीं माणसं पण परमेश्वरानें अशींच ठरवून ठेवलेलीं असतात. मावशी पण त्यांपैकींच एक आहे, नाहीं? कांहीं उपाय नाहीं ना ह्याच्यावर?

परिस्थिति अतिशय असह्य होऊं लागली म्हणजे मनुष्याला जगापासून कुठें तरी दूरदूर जावं असं वाटतं. पण दूर दूर म्हणजे तरी जाणार कुठें ? पिंजऱ्यांतल्या पोपटाला पिंजऱ्याबाहेरचं जग मोकळं वाटत असतं. पण कितीही पंख फडफडले, तरी पिंजऱ्याबाहेर त्याला थोडंच जातां येतं ? कधीं काळीं पिंजऱ्याचं दार उघडं राहील, तेव्हांच त्याची सुटका होत असते. मनुष्य हा कितीही मोठा झाला, तरी तो परिस्थितीचा दास होऊन बसलेला असतो. पाऊस थांबत नसला म्हणजे आपण छत्री धरून त्यापासून बचाव करतों. पण पाऊस थोडाच नाहींसा झालेला असतो ? जगांत दुःखाचं अस्तित्व कधींच नाहींसं होणार नाहीं. मनुष्यानें समाधानाची छत्री धरूनच आपला बचाव केला पाहिजे.

चंचला

श्री

वेल्हेर,
१२ ऑक्टोबर

प्रिय चंचला,

अलीकडे अरविंद जास्त जास्तच खिन्न दिसतात. कुठें फिरायला चलायचा आग्रह केला आणि पूर्वीसारखी विनवणी केली, तरीसुद्धा ते मुळींच तयार होत नाहींत. तुझ्या मावशीचा जाच सहन होत नसेल असं म्हणावं, तर मावशीचा जाच ह्याच्या पूर्वी पण नव्हता का ? मग तेव्हां अरविंद आयुष्याला इतके कंटाळले नव्हते ते ?

मला दुसऱ्याच प्रकारचा संशय येतो आहे. विचारूं का तुला मनमोकळे-पणानें साऱ्या गोष्टी ? आपण जिवाभावाच्या मैत्रिणी. आपण एकमेकांपाशीं आपलीं अंतःकरणं मोकळीं केलीं पाहिजेत. पुढच्या ओळी वाचण्यापूर्वी आपल्या मनाची नीट तयारी करून ठेव. बाकी तसं कांहीं विशेष नाहीं हो ! तहानेनें व्याकुळ झालेला माणूस पाणी दिसेल तिथें ओंजळ पुढें करून, घोट दोन घोट पाणी प्राशन करतो. परिस्थितीनें जर्जर झालेला मनुष्य पण असाच जिवंत जिव्हाळयाला आणि प्रेमाच्या ओलाव्याला भुकेलेला असतो.

जगांत जर ममता दाखविणारं आणि आपलेपणानें वागणारं कुणीच मायेचं माणूस नसलं, तर मनुष्याला जीवन अगदीं दुःसह होईल. सापसुद्धा आपली फणा उभारून पिलांसाठीं सावली निर्माण करतो. जगांत प्रत्येकाला माया-ममता लावलेली असते. ह्या अफाट जगांत अरविंदला तुझ्याशिवाय दुसरं कोण मायेचं माणूस आहे ? त्याला दुसऱ्या कुणाबद्दल जिव्हाळा, आपलेपणा वाटणार आहे ? फार काय, स्पष्टच सांगून टाकतें. अरविंदांच्या मनांत तुझ्या-विषयीं प्रणयभाव उत्पन्न झाला आहे. त्यांना तूं हवी आहेस !

आधुनिक युगांत स्त्री–पुरुषांची मैत्री म्हटली, कीं मला कांहींच वाटत नाहीं. पण लग्न ? पोटांत कोण धस्स होतं लागलीच ! नवरा निवडायचा म्हणजे कांहीं मनपसंत पातळ निवडण्याइतकं सोपं काम नसतं. हा गरीब, तो श्रीमंत; हा हीन कुळांतला, तो श्रेष्ठ कुळांतला; सामाजिक दर्जा, शिक्षणाचा भपका, वगैरे सर्व गोष्टींचा त्याच्यावर हल्ला होतो. शिक्षणानें सुशिक्षित मुलींचीं मनं अस्मानांत संचार करीत असतील, पण त्यांचे पाय मात्र अजून जमिनीलाच चिकटलेले आहेत. आणि म्हणूनच आपल्या कृतींत आणि विचारांत जमीन अस्मानाचा फरक पडतो. अरविंदांशीं आधिक मैत्री करण्या-पूर्वी तुझ्या परिस्थितीचा नीट विचार कर. आईबाप एकाद्या तरुणाशीं मैत्री करायला अतिशय उत्तेजन देतात. पण लग्नाचा प्रश्न आला, कीं नाक मुरडून मोकळे होतात. पुढील अनपेक्षित परिस्थितीची जाणीव तुला व्हावी म्हणून सर्व लिहिलं आहे. ह्याउप्पर कसं वागावं हा प्रश्न मात्र तुझा.

प्रेमा

श्री

वेल्हेर,
१२ ऑक्टोबर

प्रिय चंचला,

तुझं व दादाचं पत्र वाचून अतिशय वाईट वाटलं. तुझ्या दादाच्या मतें मी म्हणजे मावशीच्या येथील उष्ट्या पत्रावळीवर वाढलेला कुत्रा आहे. तुझा दादा मला असं कां म्हणूं शकला तें माहीत आहे का ? तुझ्या बाबांच्या

इस्टेटीच्या आयत्या पिठावर रेघोट्या ओढायला मिळतात, म्हणूनच त्याला हा शहाणपणा सुचतो. मेघ वास्तविक पाहातां सागरांतून पाणी घेत असतात, पण गर्जना करण्याचा आव केवढा असतो त्यांचा !

जगांतील सर्व सद्गुण, मोठेपणा, नाण्यांच्या नादावर नाचत असतात. चंचू, जगांत जगायला नालायक ठरलेल्या, हलकटांनीं हटकलेल्या आणि स्वजनांनीं झिडकारलेल्या एकाद्या माणसाला पैशाचा एकादा हांडा सापडूं दे. हार-गुच्छांचा एकच वर्षाव होईल त्याच्यावर. सूर्य उगवल्यावर सर्व तारांगण हतप्रभच होतं. मला विशेष वाईट वाटलं तें मात्र तुझं पत्र वाचून. माझ्या पत्रांतील भावनेचा तुला अर्थसुद्धा कळूं नये ना ? ही भाषा लिहून कळत नसते. ती भाषा तोंडापेक्षां डोळ्यांनाच लौकर कळत असते. तलावांत मीं उडी घेतली आणि पोहून वर आलों, तेव्हां पंचानें माझी पाठ कोरडी करीत असतां एक शब्द तरी आला तुझ्या तोंडांतून ? उलट तुझा चेहेरा गोरामोरा झाला आणि तुझ्या डोळ्यांना पाणी आलं. हृदयाची खरी भाषा मुक्याचीच असते नेहमीं. तुझ्याकरतां मीं आंबोण्याचीं फळं आणायला गेलों. कुणी तरी तुला सांगितलं, आंबोण्याच्या वेलीखालीं साप असतात म्हणून. तुझ्या आंगाला कोण दरदरून घाम सुटला होता ! मला गोड पदार्थ आवडत नाहींत म्हणून न्याहारीच्या वेळीं मीं तुझ्या पानांतलं लोणचं घेतलं, तेव्हां तुझा श्वासोच्छ्वास किती भरभर होत होता ! रक्त थांबवण्याकरितां उपयोगांत येणारीं पानकणसं तोडण्याकरितां तूं पुढें झालीस, आणि तूं पाण्याच्या दल-दलींत पडशील म्हणून मीं तुला हात धरून वर काढलं, तेव्हां तुझा हात किती थरथर कांपत होता ! कृपण माणूस एकान्तांत असला म्हणजे समोर पैशाची रास मांडून बसतो. मलाही पण तुझ्या आठवणींची रास मांडून त्यांच्याकडे सारखं बघावंसं वाटतं. रात्रींच्या वेळीं निशानाथाच्या स्वागत-समयीं आकाशाच्या प्रांगणांत चहूंबाजूला उधळलेल्या ह्या तारका एक वेळ मोजतां येतील. पण तुझ्या आठवणी ? अनंत आणि अगणित आहेत त्या साऱ्या ! पोटभर आंबरसाच्या जेवणानंतरसुद्धा आंब्याची गोडी कांहीं वेगळी असते म्हणतात. प्रत्यक्ष प्रसंगानंतरची आठवणींची गोडी पण अशीच अवीट नसते का ? किती मनाला आनंद होतो त्यांनीं ? रोज रोज नव्या नव्या नक्षत्रांत


३६४८

नाचणारा हा निशानाथ ! पण त्यालासुद्धा रोहिणीची सोबत असते. अत्यंत काळ्याकुट्ट अंतःकरणाचे हे मेघ. पण त्यांनासुद्धा विजेच्या सान्निध्याविना खडतर प्रवास झेपत नाहीं. जगाला विटलेलं एवढं कांटेरी कुंपण, पण त्यालासुद्धा आंगाखांद्यावर खेळणारी रबराची वेल असते. मग मला जर माझ्या खडतर आयुष्यांत एकादी सोबतीण हवीशी वाटली तर त्यांत वावगं तें काय आहे ? वाटेल त्या दुःसह जीवनाला टक्कर देण्याची हिंमत माझ्यांत आहे. पण काजव्याप्रमाणेंच धीरोदात्त माणसाला स्वतःला स्वतःच्या प्रकाशाचा उपयोग होत नसतो.

दीपस्तंभामुळें, जाणाऱ्या येणाऱ्या नावांचा प्रवास निर्धास्त होत असतो. पण त्याला बिचाऱ्याला सर्व आयुष्य खडकावरच कंठावं लागतं.

चंचू, तूं माझी होशील का ? हा चंद्र बघ, ढगांच्या पडद्याआडून मला सारखा हसतो आहे. ह्या तारका तर उगीच डोळे मिचकावून माझी थट्टा करीत आहेत. हा समुद्र तर कोण खदखदा हसतो आहे मला ! आणि स्वतः मात्र पृथ्वीला आलिंगन द्यायला कितीतरी उत्सुक झाला आहे ! तूं नाहीं ना वागणार तशी ? क्षितिजाच्या कडेवर हें आकाश पृथ्वीचं अहर्निश अधरपान करीत असतं. तरी अजून बिचाऱ्याची तृप्ती झाली नाहीं. बिचाऱ्या वेली तर अगदीं लाजून लाजून चूर झाल्या आहेत. पण कांहीं लाज आहे का ह्या वायूला ? आपल्या प्रियकराच्या भेटीला कोण आतुर झाली आहे ही नदी ! एका क्षणाची तरी उसंत आहे का तिला ? पण वाटेंत किती तरी अडचणी आहेत ! कांहीं क्षिति तरी वाटते आहे का हिला ? सारखी खडका–दगडांतून प्रणयगीत गात चालली आहे.

हा चकोर पक्षी साध्या पानाच्या आड राहून विरहवेदना कां सहन करतो ? त्याला उद्यांची आशा आहे म्हणूनच ना ?

सगळं विश्व कसं प्रणयाचे खेळ खेळण्यांत दंग होऊन गेलं आहे ! वाटतं, ह्या विश्वांत विलीन होऊन जावं.

चंचू, तुझ्या उत्तरावरच माझ्या भविष्याची भवितव्यताः अवलंबून आहे.

अरविंद

श्री

पुणें,

१५ ऑक्टोबर

ती. सौ. मावशीला शि. सा. न.

पत्र अगदीं अनपेक्षितच येत आहे! पण तें तितकंच महत्त्वाचं आहे. आज मी तुझ्यापाशीं तुझा पुतण्या अरविंद हा किती बहकला आहे तें सविस्तर सांगत आहे. तुला माहीत असेलच, कीं तुझ्याकडे आल्यानंतर चंचलेचा आणि अरविंदाचा परिचय अतिशय वाढलेला होता. मीं एकवार त्याला सूचना देऊन पाहिली. पण त्याच्यांत सुधारणा होण्याऐवजीं तो घसरतच चालला आहे. परवां तर एक पत्र पाठवून त्यानें चंचलेला लग्नाबद्दलच विचारलं. तुझ्या पुतण्याची येथवर पाळी जाईल असं मला मुळींच वाटलं नाहीं. आणि त्यानें पत्र तरी काय भिकार लिहिलं आहे! म्हणे क्षितिजाच्या ठिकाणीं आकाश पृथ्वीचं अधरपान करीत आहे! बरं तर बरं, टोपी कोटाचं अधरपान करीत आहे म्हणून नाहीं लिहिलं. कुठें ढग आणि कुठें वीज. कुठें कांटेरी कुंपण आणि कुठें ती रबराची वेल! उद्यां टेबल–खुर्चींचंसुद्धा लग्न लावून टाकायचे हे लोक! प्रणयांत सापडलेल्या माणसाची एक एक कृती पाहून हसतां हसतां पोट दुखून यायचं एकाद्याचं. अशा लोकांना आपल्या प्रियेच्या लग्नाला हजर राहाण्याचं आमंत्रण देणंसुद्धा मूर्खपणाचं असतं. 'हे प्रिये, मी जरी देहानें तुझ्या शेजारच्या पाटावर हजर नसलों, तरी मनानें मात्र तुझ्या हृदयांत हजर आहे. होमकुंडांतून निघणारा अग्नि मी आहे. आणि तूं धूर असून मी सारखा तुझा पाठलाग करीत आहें.' असल्या तऱ्हेचे प्रसंगाला अनुचित असे उद्गार मात्र ऐकायला मिळायचे. एकाद्या भटजीला मात्र हे एखाद्या श्रुतींतलेच उद्गार आहेत कीं काय असा भ्रम पडायचा. असल्या मूर्खांचा संतापानें कान पिळला तरीसुद्धा खूष होऊन 'कानपिळ्याचा अहेरच' अर्पण करायचे. एरव्हींच्या व्यवहारांत मनुष्य बाजवीपेक्षां अधिक अलंकारिक बोलूं लागला म्हणजे एक गोष्ट मात्र निश्चित होते. एकतर त्याचा एकादा 'स्क्रू' तरी ढिला असला पाहिजे, नाहींतर तो प्रणयांत तरी सापडला असला पाहिजे. बाकी 'स्क्रू' ढिला असणं काय आणि प्रणयांत सापडणं काय, दोन्हीही गोष्टींचा अर्थ एकच. आणि तो म्हणजे जरा 'पिळायला' पाहिजे.

बरं, स्वतःचं लग्न जुळत नाहीं असं कळल्यावर तरी स्वस्थ बसतील का? छे! 'तुझं भावी आयुष्य सुखाचं जावो. मी तुझ्यासाठीं वाटेल तितका स्वार्थत्याग करायला तयार आहे' असं म्हणायला पुन्हा तयार. एकदा तिचं लग्न दुसऱ्याशीं झाल्यावर हे कसला स्वार्थत्याग करणार आहेत तिच्यासाठीं? साराच मूर्खपणा. एखाद्या प्रतिष्ठित माणसाची फटफजिती करायची असल्यास त्याला प्रेमाच्या जाळ्यांत अडकवण्याइतका सोपा मार्ग नाहीं दुसरा. चंचलेला मागणी घालण्यांत अरविंदानें वस्तुस्थितीचा थोडा तरी विचार केला आहे का? अरविंदासारख्या कर्मदरिद्री माणसाला चंचला देऊन, भिकेची झोळी घ्यायला लावण्याइतके चंचलेचे पालक मूर्ख आहेत वाटतं? प्रेम, प्रेम झालं म्हणून काय झालं? गळ्यांत गळा घालून कल्पनेच्या साम्राज्यांत विहार करण्यांतच सारा जन्म तर घालवायचा नसतो ना? आकाशांत असंख्य तारे उगवले, तरी खिशांत जोंपर्यंत एक रुपयासुद्धा नाहीं, तोंपर्यंत पृथ्वीवर मनुष्याला जगणंसुद्धा अशक्य होईल. घरच्या बायकोला नेसायला एकसुद्धा धड पातळ नसतांना, पृथ्वी दिवसांतून किती रंगांचीं पातळं नेसली, ह्याचं वर्णन वाचून आनंद मानण्यांत काय अर्थ? कवींच्या दृष्टीनें प्रेम म्हणजे मनुष्याचं जीवितसर्वस्व असेल. पण मला मात्र तें मूर्खपणाचं भरपूर भांडवल वाटतं. मनुष्यानें भावनेच्या भरांत वाहावत न जातां, व्यावहारिक दृष्टीनें सर्व गोष्टींचा नीट विचार केला पाहिजे. अरविंदाला मीं एकवार क्षमा केली होती. पण माणूस जाणून बुजून एकादी गोष्ट करूं लागल्यास त्याचा योग्य तो बंदोबस्त करणं पण भागच पडतं. त्याशिवाय असले लोक नीट वठणीवर येत नसतात.

असो. माझी खात्री आहे, कीं तूं ह्या सर्व गोष्टींचा नीट बंदोबस्त करशील म्हणून. चांगला असा वचपा काढ, कीं पुन्हा तोंड वर नाहीं काढणार. मी पण चंचलेकडून एक निर्भर्त्सनात्मक पत्र त्याला पाठवण्याची व्यवस्था करतों. विशेषतः तिनेंच निर्भर्त्सना केली, म्हणजे स्वारी आपोआप ताळ्यावर येईल. सोनाराकडून कान टोंचलेले बरे. ह्या प्रकरणाला योग्य वेळीं आळा घातला पाहिजे. ती. बाबा चंचलेला उगीचच लाडावून ठेवतात. ती. स्व. काकांना माझे नमस्कार सांग.

दादा

श्री पुणें,

१६ ऑक्टोबर

प्रिय अरविंद,

तुझ्या पत्राचं उत्तर एका विशिष्ट तऱ्हेनें पाठवावं म्हणून दादानें धमकावणीची अगदीं शिकस्त केली. पण मीं त्याला स्पष्ट नकार दिला. तेव्हां मीं जें कांहीं लिहीत आहें तें सर्वस्वी माझंच आहे. तरी त्याबद्दल तूं मुळींच वाईट वाटून घेणार नाहींस अशी आशा आहे. लिहूं आतां काय तें ?

तुझी माझी मैत्री होती तोंपर्यंत मला कितीतरी मनमोकळेपणा वाटत होता तुझ्याबद्दल ! पण तूं विवाहाचा प्रश्न काढलास मात्र, आणि माझ्या पोटांत कोण धस्स झालं ! ! मैत्री आणि विवाह ह्यांत जमीन-अस्मानाचं अंतर असतं. मैत्रीला सारासार विचार, जात-गोत, गरीब-श्रीमंत, कुठलाच भेद कळत नसतो. परंपरागत रूढी, मानापमान, शिष्टाचाराचं पोकळ अवडंबर, सामाजिक विषमता, ह्यांचा बुजबुजाट मैत्रीभोंवतीं मुळींच नसतो. मैत्री ही दाट परिचयाच्या वेलीला येणारं एक फळ आहे. विवाह हा मात्र अनेक कारणांचा परिपाक असतो.

अरविंद, कशाला असला प्रश्न विचारलास मला ? एकमेकांना एकमेकांचा मिळेल तितका सहवास आनंदांत घालवायचा सोडून, असला प्रश्न कशाला विचारलास ? लहानपणीं आपण बाहुला-बाहुलींचा खेळ खेळत असतों. वाटेल तसला बाहुला नि वाटेल तसली बाहुली घेऊन आपल्या इच्छेप्रमाणें आपण लग्न लावीत असतों. लहानपणीं आपल्याला आपल्या बाहुला-बाहुलींचीं लग्नं जरी आपआपल्या इच्छेनुसार लावतां आलीं, तरी मोठेपणीं आपलीं लग्नं जुळवतांना मात्र आपण परतंत्र असतों. आयुष्य हें निरनिराळ्या विसंगतींनें भरलेलं असतं, नाहीं ?

आजचा आपला काल हा जुन्या-नव्याचा संधिकाल आहे ! जुनं जोंपर्यंत पार मरून गेलं नाहीं आणि नवं हें जोंपर्यंत नवं आहे, तोंपर्यंत नव्या-जुन्याच्या संघर्षणाखालीं नवीन पिढीचा सदैव कोंडमाराच होत राहाणार, आपल्या आशाआकांक्षांचा असाच चोळामोळा होत राहाणार. आम्हीं मुली कितीही

पाहूं. भावनेची भरती ओसरून गेल्यावर पायाखालची वाळू पाहून तुला परिस्थितीची योग्य जाणीव होईल. तुझ्या पत्राला मी नकारात्मक उत्तर देत आहें. पण रागावूं नकोस हं !

चंचला

श्री

वेल्हेर,
१८ ऑक्टोबर

चि. दादास आशीर्वाद,

तुझ्या पत्रांतील सर्व मजकूर मीं 'इथें' सांगितला. त्याच्या आधींच चंचलेचं कसलंसं पत्र अरविंदाला आलं होतं. तें वाचून आधींच तो बिथरला होता. तशांत 'हे' नाहीं नाहीं तें त्याला टाकून बोलले. 'इथें' माझ्यावर पूर्ण विश्वास आहे. मी जरी वडाच्या झाडाला आंब्याचीं फळं येतात म्हणून सांगितलं, तरीसुद्धा 'हे' विश्वास ठेवतील माझ्यावर. तशांत पुतण्याचं असलं वागणं म्हणजे अब्रूचा प्रश्न. मनुष्य कितीही शांत असला तरी अपकिर्ति पदरांत पडायला लागल्यावर कुणाच्या आंगाचा भडका उडणार नाहीं ? 'इथें' पण राग अनावर झाला. त्याला मात्र ह्यांचं बोलणं बरंच झोंबलं. पण मी म्हणतें, मग कराव्यात कशाला असल्या भानगडी ? तेव्हां लाज कुठें जात असते ह्यांची मेल्यांची ? तें कांहीं नाहीं. अशा लोकांना असलंच प्रायश्चित्त पाहिजे. त्याशिवाय वठणीवर नाहीं येत हे. अरविंद तडक घरांतून निघून गेला, तो अजून आलाच नाहीं. पण त्यांची काय चूक आहे ह्यांत ? अशा वेळीं नाहीं रागवायचं तर केव्हां ? आतां मात्र त्यांना फार वाईट वाटतं आहे त्याबद्दल. कसं झालं तरी आपल्या रक्ताचा पडतो ना अरविंद ! शिवाय आईबापांवांचून पोरका झालेला मुलगा हाकलून दिला, म्हणून इथल्या मित्रमंडळींत फारच वाईट मत झालं आहे स्वतःबद्दल. घरांतून हाकलून दिला ह्यांत कांहींच वाईट केलं नाहीं. पण अरविंद पडला भलताच भावनावश. उद्यां भावनेच्या भरांत त्यानें जीव बीव दिला म्हणजे उगीच आमच्या माथ्यावर खापर फुटायचं, दुसरं काय ? ह्या अनाथ मुलांना का कुठें सारासार

विचार असतो ? मनास येईल तें करणारीं हीं मुलं. असली बिनवारसी मालमत्ता सांभाळणं मोठंच जोखमीचं काम असतं. वेळ आली म्हणजे पुतण्याचं काय काय बरं केलं तें मात्र कुणालाच कळत नसतं. वाईट तेवढं एकदम नजरेंत भरत असतं. जेवतांना खडा लागल्याची आठवण बरेच दिवस टिकते. अरविंद चंचलेवर मात्र अतिशय चिडला आहे. भाकरी लौकर भाजली नाहीं म्हणजे बायका रागानें तव्यावरच थाप मारतात. तशांतलंच आहे हें करणं. तूं मात्र चंचलेवर नीट नजर ठेव. ह्यांतील कांहीं एक तिला कळतां कामा नये. त्याला पुन्हा घरांत थारा मिळणार नाहीं, असे मी 'स्वतः'चे कान भरून ठेवतें. तेव्हां त्याची तूं मुळींच काळजी करूं नकोस. भारी माज चढला होता नाहीं का त्याला ! आतां चांगली खरडपट्टी काढतें त्याची. तुझ्या आईला व बाबांना माझे नमस्कार सांग आणि चंचलेला माझे आशीर्वाद कळव.

सौ. मावशी

श्री

वेल्हेर,

१९ आक्टोबर

चंचला,

तुझ्या स्वार्थाची परमावधि झाली. तुझ्या मावशीला सर्व हकीकत कळली. वादळांत सापडलेल्या बोटीला खडकावर आपटायला कितीसा उशीर लागणार ? ती. स्व. काका नाहीं नाहीं तें बोलले. आतां होईल ना आनंद ? आज मी घराला पारखा झालों. मायेचं पांघरूण जाऊन उघडा पडलों. पण तुला सांगून काय उपयोग होणार ? प्रवाह विरुद्ध दिशेला जायला लागला म्हणजे पायाखालची वाळूसुद्धा निसटून माणसाला दगा देते. ज्याला जगांत घर नाहीं तो साऱ्या जगालाच पारखा होतो. चहूंकडून जग नुसतं खायला उठतं त्याला ! विस्तवाच्या रिंगणांत सापडलेला विंचू काय करतो माहीत आहे ना ? स्वतःची नांगी स्वतःच्यावरच मारून.........काय, हसूं येतं तुला ?

जगाच्या अंतापर्यंत अशीच हसत राहा! आकाशांत असंख्य तारे असतांना एकादाच गळून पडला म्हणून काय झालं? बरं, येतों.

अरविंद

श्री मातुंगा,

२० ऑक्टोबर

प्रिय दादा,

एकाएकीं माझं पत्र आल्यामुळें तुला जरा आश्चर्यच वाटेल. पण सध्या आम्हीं एका सफरीवर जायचं ठरविलं आहे. पुण्याच्या माझ्या स्नेह्यांपैकीं पण एक येणार असल्यानें मी पुण्याला प्रथम येऊन तिथूनच सफरीवर निघूं असं म्हणतों. तेव्हां अनायासें तुझी भेट होईलच. पण तुला पत्र लिहिण्याचं विशेष कारण म्हणजे, तूं पण आमच्या बरोबर आलास तर फारच बहार येईल. प्रवासांत संगतीसोबतीची लज्जत कांहीं वेगळीच असते. शिवाय सफरीला जितके अधिक लोक, तितका कांहीं बाबतींत त्रास पण कमी होत जातो. आम्ही ह्यावेळीं वेरूळचीं लेणीं पाहायला जात आहोंत. तूं मात्र जरूर जरूर यावंस. बौद्ध, जैन आणि ब्राह्मण ह्यांतील धार्मिक चुरस ह्या लेण्यांच्या रूपानें पाहावयास सापडते. धर्मावरील प्रेमामुळें कारागिरांनीं आपलं सर्व आयुष्य ह्या कामासाठीं वेचलं. कारागिरांची एक पिढीच्या पिढी धर्मप्रसारासाठीं रानोमाळच्या डोंगरांत हीं लेणीं उठवण्यासाठीं खर्ची पडली. पण ते दिवस आतां गेले. आजच्या मनूंत आपल्या संस्कृतीचं नुसतं नांव काढणं म्हणजे–सुद्धा प्रतिगामीपणा समजला जातो. आजच्या जगांत, गतकाळच्या इतिहासाला इसापनीतींतील गोष्टींहून अधिक किंमत राहिलेली नाहीं. सारा काळाचाच महिमा! ह्या लेण्यांचं वैशिष्ट्य म्हणजे, डोंगरांत सांपडलेल्या दगडांतून निरनिराळ्या कारागिरांनीं आपापल्या धर्मसंस्थापकांच्या मूर्ति खोदून काढलेल्या आहेत. त्यांत बुद्धाचे वीस वीस फूट उंचीचे पुतळे आंगच्याच दगडांतून खोदलेले आहेत. जैनांची इंद्रसभा अतिशय प्रेक्षणीय आहे. निरनिराळ्या रंगीत मूर्ति आज कित्येक वर्षं आपला मूळचा रंग धरून आहेत हें पाहून

अतिशय आश्चर्य वाटतं. एकेकाळीं आपल्या भारतीयांची कला इतक्या श्रेष्ठ दर्जाला पोंचली होती, ह्याचा उघड उघड पुरावा मिळतो. हिंदूंचं कैलासाचं मंदीर तर अप्रतिमच आहे असं म्हणतात. नंदीच्या डोक्यांत असलेल्या छिद्रांतून पलीकडे पाहिलं असतां पुनर्जन्म दिसतो, अशी एक आख्यायिका आहे. कलियुगांतल्या माणसानें आपला पुर्नजन्म पाहाण्याच्या भानगडींत न पडणंच इष्ट. हो! उगीच हात दाखवून अवलक्षण कशाला? कुठलीही सबब न दाखवितां तुला ह्यावेळीं अगदीं जरूर जरूर आलं पाहिजे. संसारांत पडायच्या अगोदरच प्रत्येकाला असले प्रवास आनंदानें पार पाडतां येतात. अर्थात संसारावर तुटून पडणारा जुन्या काळचा वेदान्ती मी नाहीं.

ती. स्व. बाबासाहेबांना व मातोश्रीला माझे नमस्कार जरूर सांग. चि. चंचलेला पण माझे प्रेमपूर्वक आशीर्वाद कळव. ह्यावेळीं तरी सफरीला येण्याबाबत नकार देऊं नये. विशेष भेटीअंतीं.

निशिगंध

श्री

गिरगांव, कादऱ्यांची चाळ,
खोली नं ९.
२१ ऑक्टोबर

प्रिय प्रेमा,

तुझा निरोप घेऊन मी वेल्हेर सोडून जो निघालों तो थेट मुंबईला आलों. वाटखर्चाला तूं पैसे दिलेस आणि बरोबर खायचं पण बांधून दिलंस, म्हणून प्रवासांत मुळींच त्रास झाला नाहीं. ताई, नातीं हीं जरी रक्तांतून निर्माण होत असलीं तरी प्रीति मात्र अंतःकरणांतून निर्माण होत असते. जगांत जगायला नालायक ठरलेला आणि नातेवाइकांनीं नामुष्की केलेला असा मी, आज तुझ्या एकटीच्या भगिनीप्रेमावरच जगूं शकेन. जगांत मनुष्याला मायेची, प्रेमाची, गोड शब्दांची जरूरी असते. पण बहुतेक माणसांचीं अंतःकरणं त्यांच्या मेंदूच्या खालीं दडपलेलीं असतात. परमेश्वरानें मनुष्याला निर्माण करतांनाच तशी शरीररचना करून ठेवली, त्याला कोण काय करणार?

मुंबईत पाऊल टाकल्यावर कोण भांबावून गेलों होतों मीं ! लोकल गाड्यांचा खडखडाट, ट्रॅमची धावपळ, मोटारींची ये जा आणि पायीं जाणाऱ्यांची होणारी धांदल पाहून मन अगदीं बावरून जातं. आपआपली जीवितयात्रा सुखाची करण्याकरितां मनुष्यजातीची कोण धावपळ चाललेली असते ! जरा सुखानें श्वास घ्यायलासुद्धा कुणाला फुरसत नसते. रस्त्याच्या कडेला बसून एक आंधळा सारखा दीनवाणीनें दात्याला हाक मारीत होता. पण स्वतःच्या स्वार्थापलीकडे जगाकडे ढुंकून पाहायला सवड तरी कुणाला असते ! इमारती पाहिल्या, तरी त्यांतसुद्धा उंचीकरितां एकमेकींत चढाओढ ! दोन सुंदर स्त्रिया-सुद्धा एकमेकींकडे इतक्या तिरस्कारानें पाहात नसतील. पण जरा परळच्या बाजूला दृष्टि फेकली म्हणजे मुंबईतील जीवनाच्या चित्राची दुसरी बाजू दृष्टोत्पत्तीस येते. आगपेटीच्या झाकणांत ठासून भरलेल्या काड्यांप्रमाणें चाळींतून मजूर लोक राहात असतात. स्वतःच्या चैनीपुढें कुणाला त्यांची खंत वाटत असते ?

सध्या मी एका गिरणींत ' डॉफर बॉयची ' नोकरी धरली आहे. पोटापुरते पैसे मिळतात आपले. माझं काम म्हणजे, जिथें जिथें सूत तुटेल तिथें तिथें तें सांधायचं आणि जरा वेळ लागला, कीं टप्पू खायचे. जरा टक्केटोणपे खाल्ल्याशिवाय मनुष्याला व्यवहार कळत नसतो, नाहीं ? गिरणीच्या फाटकांत पाय ठेवायचा, म्हणजे बाहेरच्या जगांतील सभ्यता, माणुसकी आणि वागण्याची पद्धत, ह्या सर्वांना फाटा द्यावा लागतो. आणि आंत गेल्यावर मनुष्याला यंत्राइतक्याच भावना उरलेल्या असतात. काय करणार ? पोट जाळण्याकरितां, इतरांच्याप्रमाणेंच, आपला सर्व स्वाभिमान गुंडाळून ठेवावा लागतो. परमेश्वरानें मनुष्याच्या पाठीला पोट चिकटवून त्याला मोठ्यांत मोठी कडक शिक्षा दिलेली आहे ना !

यंत्रांची घरघर आणि वाफ सोडून तयार केलेलं कृत्रिम वातावरण ह्यांमुळें जीव गुदमरून गेला, म्हणजे पूर्वीच्या आयुष्याचं चित्र डोळ्यांसमोर उभं राहातं. किती आनंदमय आठवणी आहेत त्या ! पण त्या कितीही चांगल्या असल्या, तरी त्यांच्या साहाय्यानें गतायुष्यांत पुन्हा जाऊन काळ कंठणं थोडंच शक्य आहे ? मनुष्य कितीही उमेदीचा असला, तरी तो बोलून चालून पडला

दैवाच्या हातांतील यमपुरीची बाहुली. दैव जसं नाचवील तसं नाचणं त्याच्या नशिबींचं थोडंच चुकतं ? भूतकाळांतील आठवणी आणि भविष्यकाळांतील आकांक्षा ह्यांच्यांतूनच मनुष्याला आपला वर्तमानकाळ निर्माण करावा लागतो. प्रेमा, पण चंचलेला एक तरी आठवण असेल का त्यांतली ? आग विझवणाऱ्या मोटारीप्रमाणेंच स्त्रीजातीला पण कांहीं गुन्हे माफ असतात, नाहीं ? तुझं पत्र आलं म्हणजे तेवढंच समाधान वाटत असतं. आतां तुझा वडील भाऊ झालों आहे बरं का मी ! पत्र पाठवलं नाहींस तर मला रागावण्याचा हक्क आहे, बरं का ?

अरविंद

श्री पुणें,

२२ ऑक्टोबर

ती. सौ. मावशीस शि. सा. न.

अरविंद अजून घरीं आला कीं नाहीं ? कीं कुठें तरी कांटेरी कुंपणा-भोंवतींची रबरी वेल पाहातो आहे ? भ्रमिष्टाला वावरायला सारं जग मोकळं असतं. अब्रूदार माणसालाच जगांत जगणंसुद्धा मुष्किलीचं असतं, एकदा अब्रू गेल्यावर.

चि. चंचूला मात्र अरविंद घर सोडून गेल्याचं कसं काय कळलं तें कांहींच कळत नाहीं. तेव्हांपासून तिची मनःस्थिति मात्र मुळींच ठिकाणावर नाहीं. सारखी एकाद्या ध्यानस्थ योग्याप्रमाणें विचार करीत असते. विचार करकरून तिचा नुसता हाडांचा सापळा शिल्लक राहिला आहे. अशक्तपणांत ती खात्रीनें कुठल्याही सुशिक्षित मुलीला हार जाणार नाहीं. शिवाय विवाहेच्छु मुलीप्रमाणें अलीकडे तिचं डोकं पण सारखं सारखं दुखत असतं. शिक्षणानें मुलींच्या कंबरा खचतात हें तर महशूरच आहे. मुलींना प्रत्येक बाबतींत कंटाळा येऊं लागला आणि कुठल्याच करमणुकींत आनंद वाटेनासा झाला म्हणजे त्याच्या-वर एकच रामबाण औषध असतं. आणि तें म्हणजे त्या मुलीचं लग्न लौकर उरकून टाकणं. चंचलेच्या बाबतींत हीं सर्व चिन्हं कधींच दिसूं लागलीं आहेत.

रोगनिदान झालं आहे. पण अजून औषधयोजना व्हायचाच विलंब आहे. रोग बराच वाढीस लागल्यावांचून बाबांचं थोडंच तिकडे लक्ष जाणार आहे? आईला फक्त तिची अतिशय काळजी वाटते. पण घरांत आयत्तेकींचं मुलींचं पटत नाहीं. हल्लींच्या सुशिक्षित मुली आपल्या आईला, सासूची वाण थोडीच भासूं देणार आहेत ? त्यांतून बाबा पण अलीकडे मुळींच आनंदी नसतात. ऑफिसच्या कामामुळें त्यांचा स्वभाव अतिशय चिरचिरा झाला आहे. परवां नुकताच त्यांना एक अर्धांगवायूचा झटका येऊन गेला. झटका लहानच होता. पण भावी संकटाचं तें एक सूचकच आहे. त्यानें आम्हीं सर्वजण अतिशय घाबरून गेलों होतों. काळजीनें आईची प्रकृति पण अतिशय खंगत चाललेली आहे. बाबांनीं पैसा पुष्कळ मिळवला. पण शिल्लक अशी कांहींच टाकली नसल्यानें, पुढें आमचं काय होणार ह्याविषयीं आई नेहमीं चिंता करीत असते. अर्धांगाच्या झटक्यापासून तर ती ही काळजी आमच्यापाशीं उघडपणें बोलून दाखवते. सध्या बाबांची प्रकृति बरी असल्यानें चंचलेला मी जरा वेरूळला न्यावं असं म्हणतों आहे. निशिगंध नांवाचा माझा मित्र बरोबर असल्याकारणानें तिचे दिवस आनंदांत जातील आणि निशिगंधाच्या सहवासानें तिच्या प्रवृत्तींत फरक पडण्याचाही बराच संभव आहे. बघूं या काय काय होतं आहे तें ती. स्व. काकांना माझा शि. सा. न. कळव.

दादा

श्री

वेल्हेर,

२४ ऑक्टोबर

प्रिय अरविंद,

तुझं पत्र वाचून आनंद आणि दुःख ह्यांच्या संमिश्र लाटा मनांत उसळूं लागल्या. तुझ्यासारख्या थंड प्रकृतीच्या माणसाला मुंबईत बावरल्यासारखं होईल हें अगदीं साहजिकच आहे. मनुष्याला आपल्या इच्छेप्रमाणें ह्या जगांत फळ मिळत नसतं म्हणूनच 'कर्मण्येवाधिकारस्ते' असं म्हणून मनुष्याला गप्प बसवणं परमेश्वराला भाग पडलं ना ? येईल त्या परिस्थितीला धैर्यानें तोंड देणं

आतां भागच आहे. एकदा समुद्रांत होडी घातल्यावर वादळाबद्दल तक्रार करून काय उपयोग? जग मोठं दुःखानें बुजबुजून गेलेलं असतं, नाहीं? चंचूच्या दादानें पण मला असंच फसविलं आहे. एकेकाळीं गळ्यांत गळा घालून भावि आयुष्याचीं किती तरी कल्पनाचित्रं आम्हीं रंगविलीं होतीं! आकाशांत आदल्या दिवशीं दिसणारी शोभा दुसऱ्या दिवशीं पण दिसते का कधीं तरी? सारखे सारखे आकाशाचे रंग पालटत असतात. कांहीं कांहीं माणसांचं अंतःकरण पण असंच नसतं का? आदल्या रात्रीं पडलेलीं स्वप्नं निदान दुसऱ्या दिवशीं स्मरतात तरी; पण आमच्या गतायुष्याच्या आठवणी, दादासाहेबांना एक तरी आठवते का त्यांतली? निजलेल्या माणसाच्या तोंडाला काळोखी फासून ठेवली, म्हणजे आत्म्याला आपल्या जडदेहाची ओळख पटत नाहीं असं म्हणतात. दादांनीं पण अशीच ओळख न पटण्याकरितां आपल्या गतायुष्याच्या आठवणींना काळोखी फासून ठेवलेली आहे. अंधारांत दिवा धरला तर उजेड तरी पडतो; पण सूर्यापुढें दिवा धरला तर उलट दिवा धरणाऱ्याचंच हसूं व्हायचं. समजून उमजून वागणाऱ्या माणसाला कोण काय करणार? चंचूनें तुला नाकारून माणसांतून मात्र उठवलं. मनुष्य सुतानें स्वर्गाला जातो कीं नाहीं तें मला माहीत नाहीं; पण तो आशेच्या धाग्यावर जगत मात्र असतो. चातकाला आपली तहान भागवावयाची तर पृथ्वीवर साती समुद्र मोकळे असतात. पण बिचारा मेघांच्या आशेनें तहानेलेलाच राहातो ना वर्षभर? मोठमोठे वृक्ष आरपार पोखरणारा भुंगा, कमलिनीच्या वेष्टनांत स्वतःला गुरफटून घेऊन मरणसुद्धा ओढवून घेतो ना? आशा ही वेडी असेल, भोळी भाबडी असेल, पण आयुष्याच्या अंधःकारांत तिचेच किरण मनुष्याला मार्गदर्शक होतात. घोंगडीवर घरघरत पडलेला मनुष्य मरणाच्या द्वारीं असूनसुद्धा शेवटच्या श्वासापर्यंत कां धडपडत असतो? त्याला जगण्याची आशा असते म्हणूनच ना? अथांग सागरांत बुडणाऱ्या माणसालासुद्धा, मृत्यूशीं केलेल्या अखेरच्या धडपडीनें तरी आपण किनाऱ्याला लागून वांचूं अशी आशा असते. कितीही संकटं आलीं, तरी तूं आपला धीर मुळींच सोडूं नकोस. उद्या चांगले दिवस आल्याशिवाय मुळींच राहाणार नाहींत. अंधाऱ्या रात्रींतूनच आशेची पहाट फुटत असते. तुला गिरणींतल्या नोकरींत फारच त्रास होत असेल, तर दुसरी कमी त्रासाची नोकरी कां पाहात नाहींस? मुंबईंत

तर उद्योगधंद्यांच्या निरनिराळ्या शाखा उपशाखांचं केवढं मोठं जाळं पसरलं आहे ! त्यांतच कुठें तरी तूं स्वतःला अडकवून घ्यावंस हें बरं. त्यांतल्या त्यांत रेल्वेंत नोकरी मिळाल्यास बरं. म्हणजे वेल्हेरपर्यंत फुकटांत प्रवास करायला मिळेल. शिवाय निरनिराळीं ठिकाणं पाहून होतील तीं वेगळींच. आम्हीं कधीं काळीं विनतिकिटानें प्रवास केला, तरी दंड माफ केला पाहिजे हं ! मधून मधून थोडे फार पैसे मागितलेस तरी कांहीं हरकत नाहीं. माझ्याजवळ तसे थोडेफार नेहमींच असतात. आम्ही मुली पैसे मिळवित नसलों तरी बाळगून असतों म्हटलं. खाण्यापिण्याचे मुळींच हाल करूं नकोस आणि चंचलेच्या उगीच आठवणी काढून मनाला पण लावून घेऊं नकोस. सगळं अगदीं नीट नीट लक्षांत ठेव हं !

प्रेमा

श्री

घृष्णेश्वर,
२८ ऑक्टोबर

प्रिय प्रेमा,

बरेच दिवसांत मी तुला पत्र लिहिलं नाहीं म्हणून तूं माझ्यावर अतिशय रागावली असशील, नाहीं ? पण अरविंदाला घराला मुकावं लागल्यापासून मला कुणाला पत्रच पाठवावंसं वाटत नव्हतं. अरविंदाला नकार देण्यावांचून मला दुसरं कोणतं गत्यंतर होतं ? विवाहाचा प्रश्न प्रेमानें सुटत नसतो; त्याला पैशाचीच मदत हवी. अरविंदाच्या दारिद्र्यांत मी भर घालून उगीच बेकारीचा वणवा भडकवण्यांत काय मतलब होता ? तशांत अरविंदांत काडीचीही धमक नाहीं. एकटा माणूस आपलं पोट कसंही भरूं शकतो. म्हशीला आपलीं शिंगं, कितीही मोठीं असलीं तरी मुळींच जड होत नाहींत. भावनेचं वादळ उठलं म्हणजे विचाराचं सुकाणूं सांभाळावं लागतं. असो. कोळसा कितीही उगाळला तरी काळाच. सध्या मी आणि दादा वेरूळच्या सफरीवर आहोंत. बरोबर निशिगंध नांवाचे दादाचे एक जुने मित्र आहेत. किती सालस स्वभाव आहे निशिगंधांचा ! आणि त्यांचं धैर्य तर अगदीं असामान्यच आहे.

अरविंद आणि निशिगंध ह्यांची मी मनांत पुष्कळदा तुलना करतें. अरविंद एकाद्या प्रचंड वृक्षासारखा वाटतो, तर निशिगंध एकाद्या गगनचुंबी पर्वतासारखे वाटतात. प्रतिकूल वाऱ्याची साधी झुळुक आली, तरी प्रचंड वृक्षसुद्धा कांपायला लागतो. पण तोच पर्वत पाहा. ऐन झंझावातांतसुद्धा कसा अढळ राहातो. निशिगंधांच्या विशाल भालप्रदेशावर बुद्धिमत्तेच्या तीव्रतेचे लेख लिहिलेले आहेत. सहनशक्ति तरी किती दांडगी आहे त्यांची ! वाटेंत सीताफळें पाडतां पाडतां एक दगड त्यांच्या डोक्याला लागून रक्ताचा प्रवाह सुरू झाला. कपडे रक्तानें माखून निघाले. पण निशिगंध अगदीं शांत उभे होते. जणूं कांहीं त्यांच्या आंगावरून घामच निथळत होता. एके दिवशीं अगदीं पहाटेस उठून मी एका काळयाकभिन्न दगडावर वेरूळची सृष्टिशोभा पाहात बसलें होतें. पातळ फडक्याखालीं झाकलेल्या लोण्याच्या गोळयासारखा सूर्य दिसत होता. मी ही शोभा पाहाण्यांत दंग असतां मी बसलेल्या काळया दगडाखालूनच एक साप फूत्कार सोडीत बाहेर पडला. घाबरून मीं किंकाळी फोडल्याबरोबर निशिगंध धावतच आले. हातांतल्या वेताच्या काठीनें त्यांनीं त्याच्या पाठींत एक सपका ओढल्याबरोबर तो त्यांच्या डोक्याइतका उंच उडाला. पण निशिगंधांनीं बिलकुल न घाबरतां वरच्यावर त्याच्या डोक्यावर एक फटका मारला, तेव्हां तो साप जमिनीवर मरून पडला. प्रेमा, निशिगंधांच्या ठिकाणीं अरविंद असता तर ? भागूबाईसारखा आपलाच जीव घेऊन पळून गेला असता. कंठ फुटेपर्यंत कोकीळ कोणचा नि कावळा कोणचा हें कळत नसतं.

वेरूळची लेणीं इतकीं कांहीं भव्य आहेत, कीं मानवी कौशल्याची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. एक कैलास मंदीर पाहिलं तरी पूर्वजांच्या बांधकामाची पुरेपूर खात्री पटते. पुढें आलेल्या साध्या डोंगराच्या कपारीवर केवढं टोलेजंगी खोदकाम उठवून दिलेलं आहे ! प्रत्येक घटकेला हें सारं आंगावर पडून चक्काचूर तर करणार नाहीं ना, अशी भीति वाटत असते. ठिकठिकाणीं खोदलेल्या मद्दिरपींतील नक्षी कितीतरी उठावदार आहे. मोठमोठ्या बुद्धाच्या पुतळयांवर भावना उमटवण्याची कला तर अगदीं अप्रतिमच आहे. बुद्धाच्या पुतळयावरील शांतिमय भाव पाहिल्यावर आयुष्यांतील साऱ्या

दुःखांचा विसर पडतो. निशिगंध तर रोजच्या रोज ह्या पुतळ्यासमोर बसून 'न तस्य व्याधिर्न जरा न मृत्युः प्राप्तः योगाग्निः अयं शरीरं' ही ओळ म्हणत असतांना कोण तल्लीन होऊन जातात! रशियांत का कुठें तरी सध्या धर्म अस्तित्वांत नाहीं ना! तिथल्या सर्वाधिकाऱ्याला आणून कांहीं दिवस ह्या लेण्यांत ठेवावं म्हणजे कळेल धर्माचा महिमा. खुद्द घृष्णेश्वरला अहिल्याबाईच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक मंदिर आहे. तुझं लग्न होण्यापूर्वी एकदा हें स्थळ जरूर पाहून ये. बाकी तुला आमचं स्थळ थोडंच आवडणार आहे म्हणा! लग्न झाल्यानंतर एकदम 'सह' येण्यांतच तुला मौज वाटायची. पण 'सह' आलं म्हणजे इथल्या मंदिरांतला पुजारी सत्यनारायणाचा आग्रह करील बरं का!

निशिगंधांची आणि तुझी मी एकदा गांठ घालून देणार आहे, म्हणजे कळेल माझं वर्णन कितपत यथार्थ आहे तें.

दादापाशीं तुझा विषय काढला, कीं तो उत्तर द्यायची अळंटळं करतो. तूं तरी कशाला त्याचा ध्यास घेतेस?

चंचला

श्री

गिरगांव,

१ नोव्हेंबर

प्रिय प्रेमा,

तुझं पत्र यायच्या आंतच मला गिरणींतली नोकरी सोडावी लागली. आपल्या पांढरपेशा लोकांना गिरणींतलीं कामं थोडींच झेपणार आहेत! एके दिवशीं आला कंटाळा आणि ठोकला गिरणीला रामराम. म्हटलं हिंदुस्थानांत अजून समाजसत्तावाद यायला अवकाश आहे, तोंपर्यंत तरी त्या गिरणीचं दर्शन नको. ज्या दिवशीं हिंदुस्थानांतील सर्व लोकांची खाजगी मालमत्ता नाहींशी होईल त्या दिवशीं पाहिजे तर करूं मजुराचं काम. पण तिथपर्यंत तर खाजगी मालमत्ता मिळवायला हरकत नाहीं! तोंपर्यंत नुसतींच व्याख्यानं

द्यावींत. मुंबईंत आल्यापासून मी जरा धीट झालों आहे. पहिल्या पहिल्यांदा आपण होऊन मी तिकिट कलेक्टरला पास दाखवीत असे. पण अलीकडे मात्र पास नसतांनासुद्धा, 'पास' म्हणून कोटाकडे बोट दाखवीत छातीठोकपणें जायला शिकलों आहे. त्याच्यानंतर कंडक्टरचा डोळा चुकवून ट्रॅममधून प्रवास करण्याची कला हस्तगत केली. मुंबईंत हरघडी इकडे तिकडे जायचा प्रसंग येतो. प्रत्येक वेळेला एक आणा कुणीं टाकावा! झालों कीं नाहीं हिशोबी? आयते कपडे (कापड आणून हातानें शिवून) विकण्याचा मी एकच दिवस प्रयोग करून पाहिला. पण तो धंदा पार बुडाला. शिवणकलेंत आम्ही मोठेच तज्ज्ञ! आयते शिवलेले सदरे डोक्यांतून खालींच उतरेनात आणि कोटाच्या बाहींत आंत हातच जाईना! म्हणून त्या धंद्याची पण इतिश्री लौकरच झाली. हल्लीं मध्ये लोकांकडून दूध घेऊन विकण्याचा धंदा मी करीत असतों. मुंबईच्या दुधांत पाणी किती असतं तें तुला माहीत नसेल. म्युनिसिपालिटीच्या डोळयांत धूळ आणि दुधाच्या हंड्यांत पाणी घालून हा धंदा करावा लागतो. म्हणजे सध्या मी पाणी विकण्याचा धंदा करतों आहें असं का म्हणेनास! हें सारं पोटासाठीं बरं.

एकदा मी मिळवता झालों, कीं माझ्याविषयीं पसरलेले सर्व गैरसमज आपोआपच नाहींसे होतील. जगांत मनुष्याला मान नसतो इतका पैशाला असतो. त्यांतून दारिद्र्य हें तर अनेक पापांचं जन्मस्थान. 'पापं कर्म च यत्परैऽपिकृतं तत्तस्य संभाव्यते' हें तर गरिबींचं मुख्य लक्षण. ताई, दादानें तुला इतक्या नीच रीतीनें वागवलं तरी तुला अजून सहानुभूति कशी वाटते? तुमच्या असल्या ह्या मुळमुळीत स्वभावामुळेंच कांहीं कांहीं पुरुष शेफारून जात असतात. आजच्या युगांत एकंदर सामाजिक परिस्थितीच इतकी विस्कळित होऊन गेलेली आहे, कीं विवाहापूर्वीच्या प्रेमांत एकनिष्ठता राखणं मुळींच शक्य दिसत नाहीं. आर्थिक विषमता, व्यक्तिस्वातंत्र्याचा अमर्यादित अवलंब आणि जुन्या-नव्यांचा संधिकाल, ह्यांमुळें आजच्या तरुण-तरुणींच्या मनांत, इंग्लंडच्या हवामानाप्रमाणें घटके घटकेला बदल होत असतो. असो. ती. दादा व मातोश्री यांस शि. सा. न.

अरविंद

श्री

वेल्हेर,
७ नोव्हेंबर

प्रिय अरविंद,

तुझें पत्र पोंचलं. तुझी 'औद्योगीकरणाची नवीन योजना' वाचून अतिशय मौज वाटली. शिफारस समितीवर जरा आमची नेमणूक करा की. मला वाटलें, दोन चार समाजसत्तावादी कादंबऱ्यांना पुरण्याइतकं भांडवल जमेपर्यंत तूं गिरणींतली नोकरी सोडणारच नाहींस ! एकंदरींत ह्या गिरणबाबूचा दूधवाला भय्या झाला तर. एकादी थबकडी टोपी घालून नाहीं ना मिरवत भय्यासाहेब आपण ? हातांतला जाड सोटा कुणावर उगारूं नका हो. तुला एक आनंदाची बातमी सांगायला विसरलेंच की मी. दोनचार दिवसांतच माझ्या मामे-बहिणीच्या लग्नासाठीं मी मुंबईला येणार आहें. तेव्हां आमच्याकडे ते नवीन शिवलेले सदरे घेऊन जरूर ये. आमच्या मामांच्या मुलांचीं डोकीं दुध्या-भोपळ्यासारखीं लांब आहेत. तेव्हां बघूं त्यांच्या डोक्यांत कांहीं शिरलं तर. आणि लग्नांत आमच्याकडे दूध पण जरूर पाठव. मात्र पाणी कीं काय तें मुळींच न मिसळतां. कारण गिऱ्हाईक अगदीं घरच्यासारखं आहे म्हटलं. बरेच दिवस, मुंबईतल्या लोकांचीं शरीरं खंगलेलीं कां असतात ह्याचा मला मोठाच प्रश्न पडलेला होता. आपण दुधांत पाणी मिसळतां हें कळल्यापासून तो प्रश्न अतिशय लौकर सुटलेला आहे. तुला मुंबईचं हवामान कितपत मानवतं आहे तें मुळींच कळवलं नाहींस. हवामान म्हणजे वातावरण नव्हे बरं का !

परवांच चंचलेचं एक पत्र आलं होतं. नुकतीच ती वेरूळला जाऊन आली. निशिगंध नांवाच्या कुणा तरी धाडसी, धैर्यवान व धडधाकट अशा 'ध धा' च्या बाराखडींतील बहुतेक गुण आंगीं असलेल्या तरुणाशीं तिचा दाट परिचय होऊं म्हणतो आहे. आणि त्याच प्रमाणांत तुझ्याविषयींचा तिरस्कार पण वाढीस लागलेला आहे. आदल्या दिवशीं देवाला वाहिलेलं फूल, मनुष्य दुसऱ्या दिवशीं निर्माल्य म्हणून पायदळीं देत असतो. आणि पुन्हा नव्या नव्या कळ्या उमलण्याकरितां पातळ ओल्या फडक्यांत भिजत घालीत असतो. चंचलेची वृत्ति पण अशीच झालेली आहे. असतील निशिगंध

धैर्याचे मेरू. पण ज्या चंचलेनें स्वतःच्या वागणुकीनें तुझ्या आयुष्याच्या पिंजलेल्या कापसावर जळता निखारा ठेवला, तिला तुझ्याशीं हेवादावा मांडण्याचं काय कारण ? परिस्थितीनें एकाद्या गोष्टीला मोडता घातला तर मनुष्याला देव आणि दैव ह्यांना शिव्यांची लाखोली वाहायला समाजानें वाटेल तितकी मोकळीक ठेवलेली आहे. अगदींच वैताग आला तर स्वतःच्या कपाळावर हात मारून घ्यावा. ज्योतिष्याला शिव्या द्याव्या. दारिद्र्य हें शाप होऊं शकेल, पण तें कुणाचा दोष तर नाहींच नाहीं. तूं गरीब झालास तो कांहीं कुणाच्या दारांत गुन्हा करून नव्हे. परमेश्वरानें माणसा माणसांत पैशाची वांटणी सारखी केली नाहीं, त्याला कोण काय करणार ? जोंपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर उंच उंच पर्वत आहेत तोंपर्यंत कुठें ना कुठें तरी दऱ्यांचं अस्तित्व हें राहाणारच राहाणार. अरू, ह्या पर्वतांतली माती खणून ह्या दऱ्यांना पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या पातळीला आणून सोडणारा माणूस केव्हां जन्माला येणार आहे ?

तुझं आणि चंचलेचं लग्न फिसकटलं म्हणून मला विशेष वाईट वाटलं नाहीं. लग्न जुळणं ही निव्वळ योगायागाची गोष्ट असते. पण लग्न फिसकटलं म्हणून तिनें दाखवलेली वृत्ति मात्र मला मुळींच आवडली नाहीं. प्रवाहांत सापडून ओघाबरोबर वाहात जाणं हें एक दुर्बलतेचं लक्षण आहे. चंचू त्यालाच बळी पडली आहे. भाग्याचं चक्र हें सदोदित फिरत असतं. आज ती वैभवाच्या शिखरावर आहे, तूं दारिद्र्याच्या दरींत खंगत पडलेला आहेस. सोडलेल्या बाणाप्रमाणें परिस्थिति पण उलटली तर ? पण नको. तुझी स्थिति सुधारली तरी तिची बिचारीची वाईट न होवो. असो. बाकी विशेष भेटी-अंतीं बोलूं. मी लौकरच, शक्य तितक्या लौकर मुंबईला येत आहें.

प्रेमा

श्री

पुणें,

८ नोव्हेंबर

प्रिय निशिगंध,

वेरूळची सफर संपवून आपण आपआपल्या घरीं परतलों. पण अजून

ती सफर संपली असेल असं मुळीं वाटतच नाहीं. स्वप्नांत सारखीं वेरूळचीं टोलेजंग लेणीं दिसत असतात. मनुष्य पाण्यांतून पोहून बाहेर पडला तरी त्याचं अंग मात्र ओलंच असतं. वेरूळची सफर संपली तरी त्या सफरींत मनावर झालेले संस्कार तसेच अजून कायम आहेत. वाटेंत औट्रॅम घाटांतून मोटार उतरतांना सृष्टिशोभेचे किती तरी उदात्त देखावे दिसत होते! वेरूळला जाण्यापूर्वी माझ्या मनांत नैराश्याचा अंधार पडला होता. पण सृष्टीचे ते अतिरम्य नि अतिउदात्त देखावे पाहिल्यावर एकाएकीं आशेचा उजेड निर्माण झाला आहे. मनुष्य उगीच्चच उदासीनतेचं कातडं डोळयांवर ओढून निराशामय जीवित कंठीत असतो. निशिगंध, स्वतःचा जीव धोक्यांत घालून दुसऱ्याचा जीव वांचवणाऱ्या तुम्हांला मी विसरेन का कधीं तरी? जन्म देणाऱ्या आईबापांचे उपकार फेडण्याची प्रत्येकाला संधि दिलेली असते. पण तुमच्यासारख्या पुनर्जन्म देणाऱ्यांचे पांग फेडतां येतील का कधीं काळीं? तुमच्या सहवासांत आमचे दिवस किती तरी आनंदांत गेले. तुमच्या सहवासांत असतांना मला पुष्कळ वेळां वाटायचं, कीं घड्याळाचे कांटे थांबवावे, सूर्याला मावळूं देऊं नये, आणि मग तुमच्या सहवासांत तासचे तास घालवावेत. पण जुळेल का हें मनुष्याला? पुण्यासारखं चांगलं शहर सोडून तुम्हांला मुंबईतल्या बजबजपुरींत कसं काय करमतं बुवा! तुमचं मुंबई शहर म्हणजे अठरा धान्यांचं कडबोळं. जिकडे पाहावं तिकडे चित्रविचित्र माणसांचे थवे, पोषाखांच्या नाना तऱ्हा आणि मायबोलींची विविधता. अगदीं कुणाचा कुणाला पत्ता नाहीं. सदोदित आपलं आगगाडीच्या डब्यांत बसल्यासारखं वाटतं. शिवाय सारखी धावपळ चाललेली असते ती वेगळीच. मनाला शांतता अशी मुळींच लाभत नाहीं मुंबईत. तेंच आमचं पुणं शहर पाहा. रोजच्या रोज कुठें ना कुठें तरी दोन चार सभा असतातच. विश्राम मंडळा-पासून तों शिशुसंगोपन मंडळापर्यंत सर्व मंडळं आहेतच. तुम्हीं जर इथें येऊन राहिलांत तर तुम्हांला रोजच्या रोज निरनिराळया सभांचं अध्यक्षस्थान स्वीकारतां येईल. नाहीं तरी म्हातारे झाल्यावर पुण्यांत बंगला बांधून तुम्ही राहाणारच ना! मग आत्तांपासूनच या की. तुम्ही साप मारल्याबद्दल मी बाबांना सांगितल्यापासून त्यांना तुम्हांला पाहायची खूपच उत्कंठा लागली आहे. आमचा दादा तर साधा विंचू मारायचा असला तरी दुरूनच जोडा फेकून

पसार होतो, म्हणून बाबा खूप थट्टा करतात. याल का आमच्याकडे खूप खूप लौकर ? ह्या वेळेस मुळींच नकार देऊन चालायचं नाहीं हो ! तुम्ही मला कितपत किंमत देतां तें आपल्या उत्तरावरून लौकरच कळून येईल. पाहूं ना तुमची वाट ? आलें पाहिजे हं.

चंचला

श्री

मांटुगा,
१२ नोव्हेंबर

प्रिय चंचलाताई,

तुमचं पत्र मिळालं. नकार देणं मोठं जिवावर आलं आहे. पण काय करणार ? माझा कांहींच इलाज नाहीं. परवां मी समुद्रकिनाऱ्यावर मजेनें फिरायला गेलों असतां एक विचित्रच प्रकार घडून आला. वेळ असेल साधारणपणें सात-साडेसातची. अंधार बराच पडलेला होता. नेहमींच्या संवयीप्रमाणें समुद्राकडे तोंड करून मी माझ्या विचारांच्या तंद्रींत अगदीं चूर होऊन गेलों होतों. इतक्यांत जवळच कुठें तरी एका मुलीचं तावातावानें चाललेलं बोलणं माझ्या कानांवर आलं. जवळ जाऊन पाहातों तर एक मुलगी एका गुंडाला चार सौम्य शिव्या हासडीत होती. तेवढ्यानेंही तो ऐकेना, तेव्हां तिनें त्याच्यावर आपली चप्पल उगारली. पण त्या मुलीच्या चपलेसकट जेव्हां तो गुंड तिला उचलून नेऊं लागला, तेव्हां मीं त्याला प्रतिकार केला. परंतु प्रतिकारांत त्या गुंडानें माझ्यावर चाकूनें हल्ला केल्यामुळें माझ्या दंडावर दोनचार किरकोळ स्वरूपाच्या जखमा झालेल्या आहेत. लौकरच मी त्यांतून बरा होईन. काळजी नसावी. मीं त्या गुंडाच्या हातून चाकू हिसकावून घेतल्यावर तो गुंड लागलीच पसार झाला. कर्मधर्मसंयोग असा, कीं मी ज्या मुलीला वांचवूं शकलों ती तुमची अगदीं निकटची मैत्रीण आहे. तिचं नांव प्रेमाताई असून ती वेल्हेरला असल्याचं सांगत होती. सध्या ती आपल्या एका मामेबहिणीच्या लग्नानिमित्त गिरगांवांत आली आहे. ती तुमची मैत्रीण असतांनासुद्धा कांहीं गोष्टी स्पष्टपणानं मांडल्याशिवाय मला मुळींच राहावत नाहीं. कांहीं कांहीं मुलींना, अगदीं

अंधार पडेपर्यंत फिरण्यांत आपण एक प्रकारचं स्वातंत्र्य उपभोगीत आहोंत असं वाटत असतं. 'आम्हां स्त्रियांतील दौर्बल्य लयास गेलं आहे आणि आम्ही सुधारणेच्या आघाडीवर राहून कुठल्याही प्रकारचे निर्बंध पाळीत नाहीं.' असं दाखवायचा त्यांत उद्देश असतो. आणि म्हणूनच त्या दिवशीं तुझ्या मैत्रिणीवर आलेला प्रसंग पाहून मला खरोखरीच हसूं लोटलं पहिल्यांदा. एकाद्या स्त्रीचा अपहार करणारा माणूस काय तिनें केलेल्या निर्भत्सनेमुळें खालीं मान घालून निमूटपणें निघून जाईल ? गुंड म्हणजे काय एकादा कॉलेजांतील संभावित मुलगा असतो ? तुझ्या प्रेमाताईनें नंतर त्याला चप्पल मारण्याची धमकी दिली. वकिलाच्या घरीं चोरी करायला आलेल्या चोराला, चौर्यकर्माबद्दल कायद्यांत काय शिक्षा आहे हें सांगणाऱ्या वकिलाची गोष्ट तुला माहीत नाहीं ? त्यांतलाच हा पण प्रेमाताईचा मूर्खपणा ! मुलींना अगोदर स्वतःचं संरक्षण करायला समर्थ केलं पाहिजे. माझ्याविषयीं मुळींच काळजी करूं नये. शरीराच्या जखमा भरून यायला थोडाच विशेष अवधि लागत असतो ? पण मनाला झालेल्या जखमा ? अगदीं खोल जीवात्म्यापर्यंत जाऊन पोंचतात त्या ! आणि त्या भरून यायला पण तितकाच उशीर लागत असतो. वर्तमानकाळ अतिशय तापदायक व्हायला लागला, कीं मनुष्यानें भविष्यकालाकडे नजर लावून आनंद मानून घ्यावा. सध्या चहूंकडे पसरलेली औदासीन्याची राख एकदा झटकून टाकली, कीं पुन्हा वैभवाचा अग्नि प्रदीप्त होईलच होईल. ही राख झटकणारा नि योग्य दिशेनें फुंकर मारणारा कुणी तरी आज जन्माला यायला हवा आहे. आज आपल्या जवळ ध्येयाच्या पुष्कळशा होड्या आहेत. पण त्यांना वल्हवणाराच अजून भेटत नाहीं. तोंपर्यंत प्रवाहाच्या लाटांबरोबर वाहात जाण्यापेक्षां नांगर टाकूनच बसलं पाहिजे. बरं वाटल्यावर लौकरच येईन.

निशिगंध

श्री

पुणें,
१४ नोव्हेंबर

ती. सौ. मावशीस शि. सा. न.

आम्ही वेरूळला जाऊन आल्यापासून चंचलेची वृत्ति बरीच आनंदित

झाली आहे. मनुष्य नेहमींच्या वातावरणांतून जरा दुसरीकडे जाऊन आला म्हणजे त्याला हुशारी वाटत असते. पण चंचलेच्या मनःप्रवृत्तींत जो फरक घडून आला तो कदाचित तिची आणि निशिगंधाची मैत्री जमल्यामुळेंही असेल. निशिगंध हा एक माझा जुना दोस्त असून अतिशय हुशार आणि धैर्यवान आहे. घरची स्थिति तर चांगलीच आहे. थोडक्यांत म्हणजे तो चंचलेला सर्वस्वीं अनुरूप असाच आहे. पण स्वारी लग्नाला तयार होईल कीं नाहीं ह्याची शंकाच आहे. इतर सगळं कांहीं ठीक आहे, तर मजुरसंघटनेचं वेडच त्याच्या डोक्यांत शिरलं आहे. आजचा काळ तर अगदीं वेगळा. कालमानाकडे पाहून माणसानें आपलं ध्येय ठरविलं पाहिजे. मीं त्याला एक पत्र पाठवून त्याचं मन वळवण्याचा प्रयत्न करून पाहाणार आहे. बाकी कितपत यश येईल त्याची शंकाच आहे म्हणा! शिवाय त्याच्या धाडसी स्वभावामुळें पण चंचलेला त्याला द्यायची बाबांना भीति वाटत आहे. कारण ही स्वारी केव्हां कोणतें संकट ओढवून आणील ह्याचा मुळींच नेम नाहीं. तशांत बाबा पेन्शनला आलेले. उगीच सरकारची मर्जी कशाला गमवा नोकरीच्या शेवटीं शेवटीं?

पण चंचलेचा त्याच्याकडे अतिशय ओढा असल्याकारणानें काय करावं ह्याची मोठीच पंचाईत पडलेली आहे. चंचला तशी भारी हट्टी आहे. तिच्या मनासारखं झालं नाहीं तर ती आकाशपाताळ एक केल्यावांचून मुळींच राहाणार नाहीं. बघूं या काय होतं तें. ती. स्व. काकांना शि. सा. न.

दादा

श्री

पुणें,
१५ नोव्हेंबर

प्रिय निशिगंध,

तुमचं पत्र वाचून माझ्या मनाला अतिशय उद्विग्नता आलेली आहे. तुम्हांला असं वाटतं, कीं तुमच्याबद्दल काळजी करणारीं माणसंच नाहींत. प्रेमाची अब्रू राखण्याचा प्रश्न होता म्हणून तुम्हीं केलंत तें बरोबर केलंत असं

वाटतं. पण नेहमी नेहमीं असा जीव धोक्यांत घालणं चांगलं नाहीं बरं का निशिगंध. तुमच्या जखमा आतां कशा काय आहेत ? एकाद्या डॉक्टरला तरी दाखवल्यात का ? नाहींतर आपले देशी उपायच करीत बसाल घरच्या घरीं, आणि सध्या कांहीं दिवस घरांतच बसून राहा. तुमचं तें मजुरसंघटण कांहीं दिवस तसंच राहिलं तरी चालेल. आज सर्वांनाच हलाखीचे दिवस आहेत. समुद्र आटल्यावर विहिरींतल्या पाण्याचा उपसा करून तो थोडाच भरून निघणार आहे ? पण आम्ही कांहींही सांगितलं तरी तुम्ही थोडाच आपला नाद सोडणार ? आपली प्रकृति बरी नसली आणि आपल्या प्रकृतीची कुणा दूरस्थ माणसाला काळजी वांटत असली तरी त्याची ती काळजी निवारण्याकरितां सरकारनें पोस्ट खात्याची चोख व्यवस्था ठेवलेली आहे, हें आपल्याला माहीत आहे ना ? मग करा की एक आणा खर्च. दोन चार दिवसांत जर तुमचं पत्र आलं नाहीं, तर मला मुंबईला यावं लागेल बरं का ? आणि मी एकदा आल्यावर एका माणसाला मुळींच हलूं देणार नाहीं घरांतून. चांगली मजुरसंघटणेबद्दल सक्तमजुरीची शिक्षा होईल दोन चार दिवस ! मी शिकल्येंसवरल्यें असलें तरी मला स्वैंपाक चांगला येतो हें ऐकून पण तुम्हांला आश्चर्यच वाटेल. मी कांहीं कच्च्या पोळया नि करपलेला भात नाहीं तुम्हांला घालणार. पाठवा हं पत्र !

चंचला

श्री

गिरगांव,
१६ नोव्हेंबर

प्रिय चंचला,

बरेच दिवसांत तुला पत्र पाठवायला मला सवडच झाली नाहीं. पण स्वतःच्यापेक्षां दुसऱ्याच्या लग्नांतच आपण अतिशय दंग असतों, नाहीं ? सध्या इथें मी माझ्या मामेबहिणीच्या लग्नाकरितां आलें आहे. आमचे मामा खूप हौशी असल्यामुळें मला इथें बरेच दिवस राहावं लागलं. सध्या अरविंद पण मुंबईतच दलालीचा धंदा करीत असल्यानें मला वेळ जायला मुळींच अडचण

पडत नाहीं. अरविंद हल्लीं महिना तीनशें रुपये कमवीत असतो. पाहिलंस अरविंदाचे वाईट दिवस कसे झटकन संपून गेले ते! काळोखी रात्र कितीही भयानक असली तरी ती कांहीं सदासर्वकाळ टिकून राहात नसते. गरिबी आणि श्रीमंती म्हणजे तरी काय? मनुष्याच्या वांट्याला येणाऱ्या दोन परिस्थितींचीं नावं आहेत तीं! पण ह्याच गरिबीला जगांतलीं सारीं पापं आणि गुन्हे चिकटविलीं जातात. तुझ्या नादीं लागून अरविंदावर घर सोडायची पाळी आली, तेव्हां एक अक्षर तरी तुझ्या मावशीच्या नवऱ्याला लिहून तूं त्याची बाजू उचलून धरलीस का? अरविंदाशीं लग्न करणं एक वेळ तुला शक्य नसेल, पण अरविंदाचा बचाव करणं तर तुझं कर्तव्य होतं ना? दूध पितांना मांजरानें डोळे मिटून घेतले म्हणून जगाला तें कळल्याशिवाय थोडंच राहातं! तुझा दादा तर काय बोलून चालून अर्ध्या हळकुंडानें पिवळा झालेला. पुराच्या पाण्याला खळखळाट फार असतो म्हणे. पण पुराप्रमाणें तो खळखळाटही क्षणभरच टिकतो हो! अरविंदावर तुटून पडण्यांत त्याला कोण कृतकृत्य झाल्यासारखं वाटत होतं! वाघ देखील आपलं भक्ष्य इतक्या आवडीनें खात नसेल. निराधार अरविंदाला घराला मुकायला लावतांना त्याला थोडं तरी वाईट वाटलं असेल का? कट्यार देखील खून करण्यापूर्वी ओली सर्द असते. पण आपण माणसासारखीं माणसं! सूड घ्यायला किती हपापलीं असतो नाहीं? पण चारी वेळा सारख्या नसतात. प्रसंगीं उतारावर गाडी असली, म्हणजे गाडीसुद्धा बैलाला लोटू शकते बरं का चंचू!

निशिगंधांनीं तुझा जीव वांचवला तर माझी जिवापलीकडे जतन करण्याजोगी अब्रू वांचवली आहे. निशिगंधांचं धैर्य, त्यांची बुद्धि नि त्याग, सर्व कांहीं असामान्य आहे. पण वटवृक्ष कितीही मोठा झाला तरी कोकिळ कांहीं आम्रवृक्षाचा त्याग करीत नाहींत. कांहीं कांहीं लोकांना नवीन घर बांधून झालं, कीं त्यांत भाड्यानें राहायला जाण्याची हौस असते. तुझ्या प्रेमाची पण अशीच विल्हेवाट लागत चालली नाहीं का? तूं माझ्या जिवाभावाची मैत्रीण म्हणून मी तुला सर्व गोष्टी स्पष्टपणें लिहिल्या आहेत. गाईला गोठ्यापर्यंत नेतां येईल, पण चारा खाणं न खाणं सर्वस्वीं तिच्यावरच अवलंबून असतं. पुरें करतें हं पत्र!

प्रेमा

श्री

माटुंगा,
१७ नोव्हेंबर

प्रिय चंचलाताई,

तुझं पत्र मिळालं. अलीकडे तुला माझी बरीच काळजी वाटूं लागली आहे. विचार तरी काय आहे बुवा तुझा ? माझे मजुरांच्याबाबतचे विचार तुला आवडत नाहींत ना ? बरोबरच आहे. चार लोक बोलतात, करतात तसंच आपणही करावं, नाहीं का ? व्यवहारज्ञान म्हणतात तें हेंच, नाहीं ?

पण मी व्यवहारी नाहीं. एकादी चांगली नोकरी धरावी अगर चांगला किफायतशीर धंदा काढावा आणि चार पैसे मिळवून आपण, आपलीं बायकापोरं, ह्यांना सुख प्राप्त करून देण्यांतच धन्यता मानावी असं मला वाटत नाहीं.

आपल्या भोंवतालीं अनेक दुःखीकष्टी लोक वावरत असतांना, त्या सर्व गोष्टींकडे कानाडोळा करून, आपण आपल्या कुटुंबियांच्या सुखसोयींतच दंग होऊन जावं हें मला इष्ट वाटत नाहीं.

चंचलाताई, मुंबईंतील मजुरांच्या चाळींतील जीवन प्रत्यक्ष पाहिलं म्हणजे हृदय पिळवटून निघतं.

राहायला पुरेशी निवाऱ्याची जागा नाहीं, खायला भरपूर अन्न नाहीं, अब्रू रक्षण करण्याइतपतही पुरेसं वस्त्र नाहीं. आणि विशेष म्हणजे एकीकडे हा केविलवाणा देखावा दिसत असतां दुसऱ्या बाजूला आकाशाशीं स्पर्धा करणाऱ्या उत्तुंग इमारतींत राहाणारे, पोटभर जेवण करून ढेकर देणारे आणि तलमांत तलम वस्त्रं परिधान करणारे लोक दिसत असतात. ह्या दोन्हीही चित्रांचा एकाच वेळीं विचार करूं लागलं म्हणजे मनाची खात्री पटते कीं, आम्हीं बांधकामशास्त्राच्या दृष्टीनें मागासलेले आहोंत, बांधकामाला लागणारं सामान उपलब्ध नाहीं म्हणून मजुरांच्या घाणेरड्या चाळी आम्ही बांधतों असं नाहीं. जी गोष्ट निवाऱ्याच्या जागेची तीच गोष्ट अन्नाची आणि कपड्यालत्त्याची पण आहे.

अर्वाचीन शास्त्रांचा जास्तींत जास्त उपयोग करून आमचं बांधकाम, कापड आणि अन्नउत्पादन हें आम्ही सुधारण्याची मुळींच आवश्यकता नाहीं असा माझ्या म्हणण्याचा मुळींच आशय नाहीं. तर मला एवढंच म्हणायचं आहे कीं, हें सारं केलं तरी, जोंपर्यंत आपण विषमतेवर आधारलेली समाजव्यवस्था बदलत नाहीं, तोंपर्यंत आपल्या शास्त्रज्ञानाचा, शास्त्रीय प्रगतीचा सर्वसाधारण माणसाला कांहीं एक उपयोग होणार नाहीं. निव्वळ यांत्रिक सुधारणांनीं अगर यंत्रांचा निव्वळ जीवनांतील गरजा भागवण्याकरितां अवलंब केल्यानें मानवजात सुखी होईल ही कल्पना कोमटेच्याबरोबरच लयाला गेलेली आहे. यांत्रिक सुधारणांचा फायदा जर सर्वसाधारण माणसाला मिळवून द्यायचा असेल तर प्रस्थापित अर्थव्यवस्था नि समाजव्यवस्था बदलायला पाहिजे, ही आजची युगप्रवर्तक कल्पना आहे. ही कल्पना बाजूला सारून लोक जेव्हां आपल्या प्राचीन संस्कृतीची महती वर्णन करतांना आणि त्या संस्कृतीच्या संरक्षणाकरितां अहमहमिकेनें पुढें येतांना दिसतात तेव्हां मला क्षणभर हसूं येतं. प्रत्येक मानवसमूहाचा अगर समाजाचा उद्धार हा त्यांतील सांस्कृतिक परंपरांना अनुसरूनच होत असतो हें मला पण मान्य आहे. पण त्याबरोबर माणसं हीं संस्कृतीकरितां नसून संस्कृति ही माणसांच्या-साठीं असते, हें पण लक्षांत ठेवायला हवं.

मानव्याच्या अन्न, कपडालत्ता आणि राहायला निवाऱ्याची जागा ह्या मूलभूत गरजा भागल्याशिवाय खरी संस्कृति अस्तित्वांतच येऊं शकत नाहीं.

आजच्या युगांत, ह्या मूलभूत गरजा भागवतां भागवतांच नाकीं नऊ येतात. अशा स्थितींत संस्कृतीचं नुसतं नांव काढणं म्हणजे दुःखीकष्टी लोकांच्या जखमांवर मीठ चोळण्यासारखं आहे.

चंचलाताई, माझं हें पुराण वाचतां वाचतां तुला खूप कंटाळा आला असेल नाहीं ? ह्याच्यापेक्षां उपमा, उत्प्रेक्षा, कोट्या ह्यांनीं सजवलेलं पत्र वाचायला तुला खूप आनंद वाटला असता, नाहीं !

पण आपल्याला जें पटतं तें दुसऱ्याजवळ मनमोकळेपणानें बोलून दाखवण्याची वाईट संवय मला लागलेली आहे.

माझी प्रकृति हळु हळु सुधारत आहे. तथापि अजून मी प्रवास करण्याच्या स्थितींत नसल्यामुळें तिकडे येऊं शकत नाहीं. शिवाय समोर कामाचा डोंगर उभा आहेच.

मजुरांना साक्षर करण्याकरितां मी शाळा चालवीत असल्यामुळें तिकडे येणं कितपत जमेल ह्याची शंकाच आहे. तूं मात्र रागावूं नकोस हं.

निशिगंध

श्री पुणें,

२८ नोव्हेंबर

प्रिय निशिगंध,

वेरूळच्या सफरीहून आल्यापासून मी तुला एकसुद्धा पत्र पाठवलं नव्हतं. पण त्याचं कारण इतकंच कीं, मला पत्र लिहायचा भारी कंटाळा आहे.

शिवाय तुझा आणि चंचलेचा पत्रव्यवहार बराच जोरांत सुरू असल्यानें मी आपला तुमची गंमतच बघत होतों. आणि आतां तरी पत्र लिहितों आहे म्हणजे काय, तर चंचलेची सारखी माझ्यामागें तुझ्याबद्दल भुणभूण चालली आहे म्हणूनच.

एकाद्या माणसावर इतकी मोहिनी टाकूं नये बरं कां निशिगंध. अलीकडे तिला चिडवायचं असलं म्हणजे मी तुझी आणि तुझ्या मजूरसंघटनेची खूप थट्टा करतों, कीं लगेच चंचलेच्या डोळयांतून गंगायमुना वाहूं लागतात. कसं आहे प्रेम ?

तिनें मला, तुला एक विचारायला सांगितलं आहे. एकदाचं धैर्य करून विचारूनच टाकतों. आमच्या आईचा आणि बाबांचा विचार तुला जावई करून घेण्याचा आहे. आहेस ना तयार ? पण लग्नाच्या मंडपांत शिरण्यापूर्वी तुला तुझे समाजसत्तावादी विचार सोडायला हवेत. बाकी तूं, चंचलेकरितां एवढा त्याग करायला सहज तयार होशील म्हणा ! त्याग ही प्रेमाची कसोटी आहे असं कुणीसं म्हटलं आहे, नाहीं का ? आमच्या बाबांची तुम्हां दोघांच्या

विवाहाबाबत एकच अट आहे. त्यांचं म्हणणं, बांधलेली शिदोरी आणि साठवलेली पुंजी फार दिवस पुरत नाहींत. तेव्हां तूं कुठें तरी नोकरी बघावीस अगर एकादा स्वतंत्र धंदा काढावास असा त्यांचा आग्रह आहे आणि माझ्या मतें हा बाबांचा आग्रह मुळींच गैरवाजवी नाहीं. एकदा लग्न केल्यावर वाढत्या संसाराची जबाबदारी पत्करावी लागते. आणि त्या जबाबदारीच्या पूर्ततेसाठीं कांहीं तरी कमाई ही करावी लागतेच. सध्यांचे दिवसच असे विचित्र आहेत कीं, वडिलार्जित उत्पन्नावर मुळींच विसंबून राहातां येत नाहीं.

सार्‍या जगांतील मजूर एकत्र यायचे नि सबंध जगावर मजुरांचं राज्य व्हायचं ह्या गोष्टीला कित्येक वर्षांचा कालावधि लागेल. तोंपर्यंत प्रत्येकाला स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारी स्वतःच वाहायला पाहिजे. नि स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारी स्वतःच वाहायची म्हणजे अर्थसंचयाची जरूर आहेच. हल्लींच्या काळीं एक जण दुसर्‍याला मनांत इच्छा असूनसुद्धा मदत करूं शकत नाहीं. परिस्थितीच अशी विचित्र झालेली आहे.

म्हणून म्हणतों, इतःपर मजुरांच्या चळवळीचा नाद सोडून कुठें तरी नोकरी बघणं अगर एकादा धंदा काढणं तुझ्या हिताचं आहे. मग बाबांच्या-कडून तुमच्या विवाहाला कसलीच आडकाठी येणार नाहीं ह्याची मी हमी घ्यायला तयार आहे. बाबांची अल्पशी अट मानायला तूं तयार होशील अशी माझी बालंबाल खात्री आहे. तुला ती अट वाचल्याबरोबर प्रथमदर्शनीं राग येण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणें अशा तर्‍हेची अट मान्य करून लग्नाला तयार होणं तुला कदाचित् अपमानास्पद पण वाटेल. पण तूं असं पाहा कीं, जावयाला आपली मुलगी देतांना आपल्या पोटचा गोळा कायमचा हवालीं करायचा असतो. तेव्हां अशा प्रसंगीं आपल्या मुलीच्या भावि आयुष्याच्या यशस्वीततेबद्दल शक्य ती सारी दक्षता घेणं हें पित्याचं कर्तव्यच असतं. तेव्हां मुद्दाम होऊन तुझी मानहानी करण्यासाठीं म्हणून नव्हे, तर आपल्या मुलीचं भावि आयुष्य सुखाचं व्हावं म्हणूनच त्यांनीं ती अट घातलेली आहे. शिवाय तुमचा हा प्रेमविवाह असल्यामुळेंच मीसुद्धा मोकळया मनानें तुला ही अट कळविलेली आहे. तरी ह्याबाबत तूं स्वतःचा गैरसमज करून घेणार नाहींस अशी आशा आहे.

चंचला आणि तूं परस्परांना सर्वस्वीं अनुरूप आहांत. तुम्हा दोघांचीही पत्रिकासुद्धा न पाहातां मी बिनदिक्कतपणें छत्तीस गुण जमतात म्हणून सांगूं शकेन. तुमचा दोघांचा विवाह झाल्यास मला खरोखर मनापासून आनंद होईल.

मैत्रीचं रूपांतर नात्यांत झाल्यास कुणाला आनंद होणार नाहीं ?

आणि मग चंचलेच्या आनंदाला तर सीमाच राहाणार नाहीं.

वैवाहिक जीवनांत स्वतःला सर्वस्वी पसंत असा जोडीदार लाभणं, ह्याच्या-सारखं दुसरं आनंदाचं अगर भाग्याचं लक्षण कोणतं असणार ?

माझ्या पत्राचं उत्तर पाठवायला उशीर नाहीं करायचा बरं का जावईबुवा. नाहीं तर मेहुण्याला कान पिळायचा हक्क असतो, हें माहीत आहे ना ?

इतक्यांतच रुसून बसायचं नसतं बरं का निशिगंध.

दादा

श्री

माटुंगा,
३० नोव्हेंबर

प्रिय दादा,

कित्येक वेळीं पावसाप्रमाणें पत्रंसुद्धा अनपेक्षित येत असतात. तुझं पत्र वाचून तर मी अतिशय गोंधळून गेलेलों आहें. चंचलाताईशीं वागण्यांत माझ्या हातून कांहीं चूक तर झाली नाहीं ना, नि म्हणून तूं मला टोमणा तर मारीत नाहींस ना ?

तें कांहीं का असेना. मी आपला त्यांतील सरळ अर्थ घेऊन तुला उत्तर पाठवीत आहें. असल्या प्रश्नांचीं उत्तरं देण्याचा प्रसंग माझ्यावर इतक्यांतच येईल असं मला मुळींच वाटलं नव्हतं. पण आतां प्रसंग आलाच तर उत्तर देणं भाग आहे. मी ज्या प्रश्नांचीं उत्तरं योजून ठेवलीं होतीं ते प्रश्न लग्नासंबंधीं असण्याऐवजीं माझ्या कार्याबद्दल होते.



[illegible] वाचनालय दादर
[illegible] २३६७८ [illegible]

अर्थात् मी मजुरांच्यांत कार्य कां करितों अगर मी इतक्यांत लग्नाला कां तयार नाहीं ह्या दोन्हीही प्रश्नांना एकच उत्तर आहे. दादा, दारिद्र्य, अज्ञान आणि दुःख ह्यांनीं गांजलेले अनेक लोक सभोंवतालीं वावरत असतां, डोळ्यांवर व्यवहाराचा पडदा ओढून हें असंच चालायचं असं म्हणून स्वस्थ बसणं निदान मला तरी शक्य नाहीं.

आपल्याला दुसऱ्याचं देणं असलं म्हणजे आपण स्वतःचीं सुखं, स्वतःच्या चैनी बाजूला सारून ज्याप्रमाणें दुसऱ्याचं देणं फेडून टाकतों, त्याचप्रमाणें समाजाचं पण आपण कांहीं देणं लागत असतों. हें देणं फेडल्याशिवाय व्यक्तीला केवळ स्वतःच्या आणि स्वतःच्या मुलाबाळांच्या सुखांतच दंग होऊन राहाण्याचा, माझ्या मतें नैतिक अधिकारच नाहीं.

दुसऱ्याचं देणं स्वतःच्या डोक्यावर तसंच कायम ठेवून चैनींत पैसा उधळणाऱ्या माणसाला आपण ज्याप्रमाणें दोष लावतों त्याचप्रमाणें भोंवतीं दुःखीकष्टी लोक असतांना केवळ स्वतःच्या सुखांतच दंग होणारा माणूस पण दोषास्पद आहे.

आपल्यापैकीं प्रत्येकजण समाजाचं कांहीं ना कांहीं देणं लागतो ही गोष्ट वादातीत आहे. आजचीं यंत्रं, आजच्या साऱ्या सुखसोयी ह्या कोणा एका व्यक्तीनें निर्माण केलेल्या नसून सततच्या सामुदायिक प्रयत्नांतूनच त्या साऱ्या निर्माण झालेल्या आहेत. आणि म्हणून त्या सुखसोयींचा सर्वांना सारख्या प्रमाणांत उपभोग घेण्याजोगी परिस्थिति निर्माण करणं हें आपल्यापैकीं प्रत्येकाचं कर्तव्य आहे.

ह्या वस्तुस्थितीकडे कानाडोळा करून आपण आपल्यापुरतंच पाहावं, सर्व कांहीं बदलेल तेव्हां आपण पण बदलूं असं जर कोणी म्हणत असेल, तर त्याला मला लावी पक्षीण आणि तिच्या मुलांची गोष्ट नीट समजवून सांगावी लागेल.

वारा कोणत्या दिशेनें वाहातो आहे त्याप्रमाणें आपलं शीड उभारणारा खलाशी हा जसा शहाणा ठरतो, त्याचप्रमाणें काळाचीं पावलं कोणत्या दिशेनें पडत आहेत हें ओळखून त्याप्रमाणें आपल्या वागणुकींत बदल करणारा

माणूसही शेवटीं शहाणा ठरतो. सारं जग बदलल्यावर प्रत्येकालाच सक्तीनें बदलावं लागतं. अशा तऱ्हेच्या सक्तीच्या बदलापेक्षां स्वखुषीचा बदल अधिक सुखावह नाहीं काय ?

कोणी कांहींही सांगितलं, तरी मी गोरगरिबांच्या सेवेपासून मुळींच परावृत्त होणार नाहीं. माझ्या वडिलांना नवीं नवीं घरं बांधण्याचा नाद होता. मला हा समाजसेवेचा नाद लागलेला आहे असं का म्हणेनास.

आणि म्हणून खडतर आयुष्य कंठायला तयार असणाऱ्या माझ्यासारख्या माणसानें लग्नच करूं नये हें उत्तम. कारण मी लग्न केल्यास माझी पत्नी नि मुलंबाळं ह्यांना पण सक्तीनें माझ्यासारखाच खडतर आयुष्यक्रम कंठावा लागेल. आपल्या प्रखर आयुष्यक्रमाची झळ आपली पत्नी, आपलीं मुलंबाळं ह्यांना पण लागावी असं मला मुळींच वाटत नाहीं.

ह्या दृष्टीनें विचार करितां, तूं तुमच्या बाबांची म्हणून सुचविलेली अट माझ्या पथ्यावरच पडत आहे.

ती अट मी मुळींच पाळूं इच्छीत नाहीं आणि म्हणून चंचलेच्या आणि माझ्या विवाहाचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. बिचाऱ्या चंचलेबद्दल मात्र मला सहानुभूति वाटते. माझ्या मोकळेपणाच्या वागणुकीचा तिनें चुकीचा अर्थ केला. अर्थात् ह्यांत तिचा तरी काय दोष आहे ? एकाद्या उपवर मुलीनें दुसऱ्या एकाद्या उपवधू मुलाच्या मोकळेपणाचा असा अर्थ केल्यास त्यांत काय वावगं आहे ?

माझ्या नकारानें चंचलेची काय मनस्थिति होईल ह्याची तर मला कल्पनाच करवत नाहीं. तिला नकार देऊन मनस्वी दुःखी करण्याचा माझ्यावर प्रसंग यावा ह्याबद्दल मला अतिशय दुःख होत आहे. तिला चार सांत्वनपर शब्द सांगून तिचं समाधान करणं शक्य असल्यास तूं जरूर प्रयत्न कर. अर्थात् प्रेमभंगाचं दुःख हें नेहमींच असह्य असतं. सांत्वनपर शब्दांनीं दुःखाच्या जखमा पण कधींच भरून येत नसतात. तथापि हें सारं जरी खरं असलं तरी माझा सर्वस्वी नाइलाज आहे.

चंचलेच्या प्रेमभंगाच्या दुःखापेक्षां मला इतरांचीं दुःखं हीं अधिक महत्त्वाचीं वाटतात असा आरोप तूं कदाचित् माझ्यावर करशील.

पण खरं सांगूं का दादा ? अशा तऱ्हेची तुलनाच होऊं शकत नाहीं.

आयुष्यांत केव्हां केव्हां असे प्रसंग येतात कीं, त्यावेळीं माणसापुढें दोनच पर्याय असतात. नि तेही असे कीं त्यांपैकीं कोणत्याही एकाचा अवलंब केल्यास कुणाला ना कुणाला तरी दुःख हें द्यावंच लागतं. पुन्हा एकदा चंचलाताईचं सांत्वन करण्याची विनंती करतों.

निशिगंध

श्री

पुणें,
२ डिसेंबर

प्रिय निशिगंध,

आपलं ती. स्व. दादाला आलेलं पत्र वाचून मनस्वी वाईट वाटलं.

पक्षी आकाशांत भरारी मारीत असतांना त्यांना सारं आकाश विहार करायला मोकळं आहे असं वाटत असतं. पण मधूनच कुठून तरी व्याधाचा बाण त्यांना जायबंदी करतो. माझी पण तशीच अवस्था झालेली आहे. भावि आयुष्याविषयीं किती तरी कल्पनाचित्रं मी रंगवलीं होतीं. पण तुमच्या नकारानें तीं सारीं पुसून टाकलेलीं आहेत.

दिवा जळत असतां वात जळून खाक होऊं नये म्हणून वातीला तेल देऊन दिव्याचा प्रकाश कायम ठेवायचा असतो.

मानवी जीवनांत पण आशेचा दीप सतत तेवत ठेवण्यासाठीं प्रेमाची तशीच आवश्यकता असते.

निशिगंध, तुम्ही बोलून चालून ध्येयवादी आहांत. तेव्हां भोंवतालच्या विरोधी परीस्थितीमुळें निराश होण्याचा तुमच्यावर हरघडी प्रसंग येणार. अशा

२९५७८
मा. ८ण
७८५७
2-7-५

वेळीं एक स्त्रीचं प्रेमच तुमच्या भोंवतालचं निराशेचं धुकं नाहींसं करून तुम्हांला कार्यप्रवृत्त करायला समर्थ आहे.

स्त्री ही पुरुषाच्या मार्गांतील धोंड नाहीं, तर ती त्याला मार्ग दाखविणारी अखंड ज्योत आहे.

आपण लग्न केलं, तर आपण आपल्या मुलाबाळांतच गुरफटून जाऊं अशी भीति तुम्हांला कां वाटावी हेंच मला समजत नाहीं. तुम्ही जर खरोखर इतके भित्रे असाल, तर तुमच्या हातून मजुरांच्या सेवेचं खडतर कार्य कसं काय पार पडेल ह्याची कुणालाही शंकाच वाटेल.

शिवाय असं पाहा कीं, आपलं अंगीकृत कार्य पार पाडायला विवाहित माणूस हा जितका समर्थ असतो, तितका अविवाहित माणूस हा मुळींच समर्थ नसतो. कारण कामवासना ही नैसर्गिक असल्यामुळें, अविवाहित माणसाची बरीचशी शक्ति त्या मोहापासून स्वतःचा बचाव करण्यांतच खर्ची पडत असते.

एकाद्या तरुण मुलानें प्रेमभंग झाला म्हणून वैतागाच्या भरांत जर आजन्म अविवाहित राहाण्याची प्रतिज्ञा केली, तर निव्वळ वैतागाच्या भरांत त्यानें तसं केलं असं तरी म्हणतां येईल.

पण तुमची गोष्ट कांहीं तशी नाहीं. चांगली चालत आलेली संधी तुम्हीं वाया दवडीत आहांत.

आणि असं करीत असतां माझ्यावर त्याचा काय परिणाम होईल ह्याचा तुम्ही फारसा खोलवर विचार केलेला दिसत नाहीं.

दादाला लिहिलेल्या पत्रांत त्याला तुम्ही माझं सांत्वन करायला सांगितलं आहे. माझ्याविषयीं तुम्हाला सहानुभूति वाटत असल्याचं पण लिहिलं आहे. पण खरं सांगू का निशिगंध ? प्रेमभंगामुळें ज्या स्त्रीच्या मनाला प्रचंड धक्का बसलेला आहे, तिला असल्या शाब्दिक सहानुभूतीनें आणि सांत्वनानें कितीसं बरं वाटणार आहे ?

जी गोष्ट सर्वस्वी अपरिहार्य आहे तिच्या बाबतींत कोणी आपलं सांत्वन केलं, तर माणसाला थोडंफार तरी समाधान वाटेल. पण जी गोष्ट सर्वस्वी

आपल्या हातांतील आहे, तिच्या बाबतींत आवश्यक तें करायचं सोडून निव्वळ सहानुभूति दाखवणं कितपत योग्य आहे ह्याचा तुम्हीच विचार करणं बरं.

निशिगंध, प्रेम हें पुरुषाच्या जीविताचा एक भाग असतो तर स्त्रीचं तें जीवितसर्वस्व असतं.

प्रेमभंग झालेल्या स्त्रीला जिवंतपणींच मरणाच्या यातना सोसाव्या लागतात. म्हीं शांत मनानं विचार करून योग्य तो निर्णय घ्याल अशी आशा करून पत्र संपवतें.

चंचला

श्री

माटुंगा,
४ डिसेंबर

प्रिय चंचलाताई,

तुमचं पत्र मिळालं. कामाच्या गडबडींत असूनसुद्धा तुमच्या पत्राचं महत्त्व जाणून सवड काढून तुम्हांला उत्तर लिहीत आहे. तुमचं पत्र वाचल्यावर मी माझ्या मनाशीं शांतपणें विचार केला कीं, मी तुमच्याशीं अशा तऱ्हेनें वागलों काय कीं ज्यामुळें तुमच्या मनांतील प्रेमाचा अंकुर मी आपण होऊन जागृत केलेला आहे.

मी परोपरीनें विचार करून पाहिला, पण मी अशा तऱ्हेनें तुमच्याशीं वागलों असल्याचं मला स्मरत नाहीं. मी कदाचित् तुमच्याशीं मोकळेपणानें वागलों असेन, क्वचित् प्रसंगीं तुम्हाला मी सहानुभूति पण दाखवली असेल, पण त्याचा अर्थ जर विवाहविषयक प्रेम असाच तुम्ही करीत असाल तर कोणाही उपवधू मुलाला परक्या मुलीशीं तुसडेपणानेंच वागायला पाहिजे.

प्रेमविवाह हा तेव्हांच यशस्वी होत असतो, कीं जेव्हां स्त्री-पुरुषांच्या परस्पर प्रदीर्घ सहवासांतून एकमेकांना एकमेकांचा स्वभाव, जीवितविषयक दृष्टिकोन समजलेला आणि पटलेला असतो. आणि अशा मानसिक एकीकरणांतून परस्परांना परस्परांबद्दल आकर्षण निर्माण झालेलं असतं.

चंचलाताई, माफ करा हं मी जरा अधिक स्पष्ट बोलतों म्हणून. पण जें सत्य आहे तें मला सांगितलंच पाहिजे.

तुमचा स्वतःचा स्वभाव नि तुमच्या निकटवर्ति नातेवाईकांच्या आवडी-निवडी लक्षांत घेतां, आपला विवाह सुखावह होईल असं मला मुळींच वाटत नाहीं.

तुमचे वडील नि तुमचे भाऊ ह्या दोघांनाही मी माझं कार्य सोडून लौकिक गोष्टींच्या मागें लागावं असं वाटतं.

तुमचं मन तुम्ही नीट तपासून पाहिलंत तर तुम्हांला आढळून येईल कीं, तुमचं खरंखुरं प्रेम निशिगंध ह्या व्यक्तीवर आहे. निशिगंधाच्या अंगीकृत कार्यावर नाहीं. आणि अशी जोंपर्यंत परिस्थिति आहे तोंपर्यंत तुमचा नि माझा विवाह हा अंतीम परिणामाच्या दृष्टीनें सुखावह होईल असं मला मुळींच वाटत नाहीं. विवाह हा वैवाहिक जीवनाची सुरुवात असते, शेवट नव्हे. नि म्हणूनच मी विवाहापेक्षां वैवाहिक जीवनालाच अधिक महत्त्व देतों. विवाह हा जरी दोन व्यक्तींतच होत असला, तरी वैवाहिक जीवनाच्या यशस्वीततेच्या बाबतींत अनेकांचा संबंध येतो.

घटकाभर तुम्ही अशी एक कल्पना करा, कीं तुमची एक वडील बहीण चांगल्या श्रीमंत मुलाला दिलेली आहे. अशा परिस्थितींत तुमचा जर एकाद्या ध्येयवादी मुलाशीं विवाह झालेला असला आणि वडील बहिणीप्रमाणें तुम्हांला जर चैनींत राहातां येत नसेल, तर तुम्हांला त्याबाबत विषाद वाटल्याशिवाय राहील काय ?

म्हणून म्हणतों, क्षणिक मोहाला बळी पडून आपलं वैवाहिक जीवन दुःखाचं करून घेऊं नका. निदान मी तरी, माझी जोंपर्यंत खात्री आहे कीं तुम्ही आणि तुमच्या भोंवतालचे लोक हे ध्येयवादी नाहींत तोंपर्यंत असल्या गोष्टीला मुळींच मान्यता देणार नाहीं.

आपण हल्लीं ज्याला प्रेम म्हणून म्हणतों तें स्त्री-पुरुषांना परस्परांबाबत वाटणारं सर्वसामान्य स्वरूपाचं आकर्षण असतं. त्यांच्यात विवाहित पती-पत्नींच्या ठायीं असणाऱ्या निष्ठेचा निव्वळ भास असतो.

म्हणूनच पुष्कळसे प्रेमविवाह हे अलीकडे सुखावह होत नाहींत.

म्हणून म्हणतों, मी तुम्हांला नकार देण्यांत आज जरी तुमचं मन दुखवीत असलों तरी परिणामीं तें तुमच्या हिताचंच आहे.

माझ्याबद्दल म्हणाल, तर आमच्यासारख्यांचं आयुष्य हें असंच जाणार. त्याची झळ निदान दुसऱ्याला तरी लागूं नये.

तुम्ही शांत मनानें विचार केल्यास माझ्यावर रागावणार नाहीं असं वाटतं.

निशिगंध

श्री

पुणें,

९ डिसेंबर

प्रिय प्रेमा,

मनुष्य इच्छितो एक नि दैवाच्या मनांत असतं दुसरंच.

निशिगंधांच्याविषयीं मी माझ्या मनांत किती आशा बाळगलेल्या होत्या! दादा आणि बाबा ह्यांच्या संमतीमुळें त्या आशांना सुखाची पालवी फुटलेली होती.

पण निशिगंधांनींच स्वतः लग्नाला नकार दिल्यामुळें माझ्या आशेचं रोप मुळासकट उपटलेलं आहे.

क्षितिजाच्या ठिकाणीं तरी आकाश आपल्या हाताला लागेलसं वाटत असतं. पण प्रत्यक्ष अनुभवान्तीं निराशाच पदरीं येते.

माझी स्थिति पण तशीच झालेली आहे. आणि निशिगंधांनीं नकार देण्याचं कारण काय, तर म्हणे मी त्यांच्या ध्येयवादी जीवनाशीं समरस होऊं शकणार नाहीं. कुत्र्याला गोळी घालायची असली म्हणजे त्याला पिसाळलेला म्हटलं म्हणजे झालं. निशिगंधांनीं माझ्यावर केलेला आरोपही मला ह्याच प्रकारचा वाटतो.

मला दाट शंका येते कीं, निशिगंधांचं दुसऱ्या कोणावर तरी प्रेम असावं नाहीं तर त्यांनीं माझ्या मागणीला नकार दिलाच नसता. स्त्रीचं मन नि स्त्रीचं प्रेम, ह्याची पुरुषजातीला मुळीं तरी कल्पना असते का ?

खेळतां खेळतां लहान मूल सहजासहजीं एक खेळणं टाकून दुसरं खेळणं. घेतं. पुरुषांना पण लहान मुलांप्रमाणें स्त्रीजात ही त्या खेळण्यासारखीच वाटते.

निशिगंध मला लिहिलेल्या पत्रांत म्हणतात, 'तुम्ही आणि तुमचे निकटवर्ति नातेवाईक ह्यांच्या स्वभावाचा विचार करितां हा विवाह सुखाचा व्हायचा नाहीं.'

पण त्यांच्या हें लक्षांत यायला हवं होतं कीं, तो प्रश्न त्यांचा नसून माझा आहे. मी आणि माझे जवळचे नातेवाईक ह्यांचा स्वभाव मला जास्त माहीत कीं निशिगंधांना ? पण झोंपलेल्याला जागं करतां येतं. जागा असून झोंपेचं सोंग घेणाऱ्याला कसं काय जागं करतां येईल ?

पुरुषांना वाटतं, आजची सुशिक्षित स्त्री ही सुखाचैनीला लालचावलेली असते. तिला त्याग कसा तो माहीतच नसतो.

पण आजची सुशिक्षित स्त्री ही त्यागाकडे पाठमोरी नाहीं. आम्ही सुशिक्षित स्त्रिया वैवाहिक स्वातंत्र्याकरतां जी कांहीं चळवळ करतों तीं व्यक्ति ह्या दृष्टीनें आम्हांला प्राप्त होणाऱ्या हक्कांकरतां असते. निव्वळ सुखा-चैनी-करतां नसते.

ह्या बाबतींत निशिगंधांना अधिक कांहीं लिहावंसं मला मुळींच वाटत नाहीं. ज्याला नकारच द्यायचा आहे त्याला काय वाटेल ती सबब सांगतां येते. शिकलेले पुरुष झाले म्हणून काय झालं ? ते विचारांना वश न होतां विकारालाच बळी पडत असतात !

आपलं दुःख निमूटपणें सहन करण्याची आपल्याला अनेक युगांपासून सवय आहे.

चंचला

श्री

गिरगांव,
१४ डिसेंबर

प्रिय चंचला,

तुझं पत्र वाचून अतिशय वाईट वाटलं. माझा मनोभंग झाला तसा निदान तुझा तरी होणार नाहीं, निदान होऊं नये असं मला मनापासून वाटत होतं.

पण आपली मनस्थिति ठीक नाहीं तर नाहीं, निदान आपली मैत्रिण तरी आनंदांत असलेली पाहावी असं मला जें वाटत होतं, तेवढं समाधानसुद्धा दैवाच्या मनांत मला मिळूं द्यायचं नव्हतं.

चंचू, आपण शाळेंत असतांना भावि जीवनाविषयीं किती तरी सुखस्वप्नं मनांत योजलेलीं होतीं! पण तीं सारीं धुळीला मिळालीं आहेत. मला वाटतं, आपली सारी तरुण पिढी वैवाहिक जीवनाच्या बाबतींत असंतुष्टच राहाणार आहे.

हल्लीं पूर्वींसारखीं लहान वयांत लग्नं होत नाहींत. त्यामुळें वयांत आल्या-नंतर मुलांमुलींना परस्परांत मिसळावंसं वाटतं. ह्या परस्पर सहवासांतूनच प्रेम निर्माण होतं. पण मुलांमुलींचं प्रत्यक्ष प्रेम जमून त्यांच्या लग्नाचा प्रश्न उत्पन्न होईपर्यंत आपले पालक त्याकडे दुर्लक्ष करतात.

आणि एकदा लग्नाचा प्रश्न उपस्थित झाला म्हणजे मग पालक जागे होतात नि धाकदपटशा दाखवूं लागतात. .

त्यामुळें प्रेमविवाह म्हटला कीं वडीलधाऱ्या माणसांशीं संघर्ष हा ठेवलेलाच. हा संघर्षच आपल्या तरुण पिढीच्या वैवाहिक असमाधानाचं प्रमुख कारण आहे. निशिगंधांनीं तुला नकार देतांना निदान सबळ कारण तरी दिलं होतं. पण तुझ्या दादांनीं मात्र मला निष्कारण नकार दिला. पुन्हा पुन्हा कोळसा उगाळूं नये असं वाटतं. पण खरं सांगूं का?

पुरुषांच्या बाबतींत तितकं निश्चित मला सांगतां यायचं नाहीं. पण स्त्रीच्या बाबतींत मी निश्चितपणें सांगूं शकेन कीं, स्त्री ही आयुष्यांत एकदाच खरंखुरं प्रेम करूं शकते. नि ह्या प्रेमाशीं संबद्धित असणाऱ्या आठवणी ती

कधींच विसरूं शकत नाहीं. तथापि असं जरी असलं, तरी दुःखाच्या आठवणी पुनःपुन्हा उकरून काढून सुखाची प्राप्ती कधींच होत नसते. आठवणींचा कोळसा हा कितीही उगाळला तरी तो काळाच राहातो.

मानवी आयुष्य हें सतत पुढें जाणारा प्रचंड प्रवाह आहे. म्हणून प्रत्येकानें भविष्यकाळाकडे नजर टाकून ह्या प्रवाहाबरोबर पुढें जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

माणसाला भूतकाळांत जाऊन वावरणं कधींच शक्य नसतं. त्याचप्रमाणें वर्तमानकाळ हा जरी कितीही तापदायक असला, तरी कडक उन्हाळ्यानंतर पावसाळा पण लौकरच येणार असतो.

म्हणून तुला माझं आग्रहाचं सांगणं आहे कीं, तूं निराश होऊं नकोस. आजच जर समाधानाचं, आशेचं बीज पेरलं तर लौकरच आनंदाचा बगीचा फुलल्याशिवाय राहाणार नाहीं.

प्रेमा

श्री

पुणें,
१५ डिसेंबर

ती. स्व. सौ. मावशीस,

कळविण्यास अतिशय वाईट वाटतं कीं, काल रात्रीं ती. बाबांना एकाएकीं जोराचा अर्धांगवायूचा झटका येऊन त्यांतच त्यांचा अंत झाला. ह्या जगांत आम्ही पोरके झालों. आमच्यावर दुःखाचे डोंगर कोसळले. ती. मातोश्री अतिशय अस्वस्थ झाली आहे. तूं ताबडतोब इकडे निघून ये. ह्या वेळीं तरी नकार देऊं नये. चि. चंचला तर फारच अस्वस्थ झाली आहे. एकीकडे बाबांच्या मृत्यूचा धक्का, तर दुसरीकडे निशिगंधानें नकार दिला म्हणून तिचं मन अस्वस्थ आहे. एकदा संकटं येऊं लागलीं म्हणजे तीं मनुष्यावर चहूंकडून मारा करूं लागतात.

संकटांना माझं मीच शांतपणें तोंड दिलं पाहिजे. तरी पण आम्हां सर्वांवर आकाशच कोसळल्यामुळें मी पण भांबावून गेलों आहे. तूं जर चार दिवस आलीस तर तेवढंच सर्वांना हायसं वाटेल.

दादा

श्री

वेल्हेर,
१७ डिसेंबर

चि. दादास,

आपल्याकडील दुःखद वार्ता ऐकून अतिशय वाईट वाटलं. परमेश्वराच्या इच्छेपुढें इलाज नाहीं. जगाच्या वहिवाटीकडे बघून आपण आपलं दुःख हलकं करावं. पुढील काळजी करूं नये. तुम्हीच हातपाय गाळल्यावर बाकीच्यांनीं कुणाच्या तोंडाकडे बघायचं ?

मी सध्यां हांथरुणाला खिळलेला असल्यामुळें सौभाग्यवतीला पण तूर्त येणं शक्य नाहीं ह्याबद्दल मनस्वी वाईट वाटत आहे. मला बरं वाटल्यावर आम्ही दोघंही तिकडे येत आहोंत. आणि मग आपण सर्वजण मिळून इकडेच येऊं.

आजरोजीं पन्नास रुपये पाठवीत आहे. आणखी लागले तरीसुद्धा पाठवीन. पैशाची मुळींच काळजी करूं नये. तुमच्या मातोश्रींची पण समजूत काढायचा प्रयत्न करा. अर्थात् शब्दापेक्षां काळच अशा बाबतींत जास्त उपयोगी ठरतो.

काका

श्री

वेल्हेर,
२२ डिसेंबर

चि. अरविंदाला आशीर्वाद,

हल्लीं दादरला तुझं ठीक चाललं आहे हें ऐकून अतिशय आनंद झाला. मागें तुझ्या काकूच्या सांगण्यावरून मीं उगीचच तुला घरांतून काढलं. तुझ्या कर्तबगारीबद्दल आज मला पूर्णपणें खात्री पटलेली आहे.

[illegible]. तुझ्या काकूच्या माहेरची सर्व मंडळी आज इथें आमच्याच आश्रयाला वि[illegible]ळी आहे. घरांत चंचलेसारखी वाढत्या वयाची सुशिक्षित मुलगी ठेवणं काढाय[illegible]चं आहे. आधीं मुलगी, त्यांतून वाढत्या वयाची आणि त्यांतून पुन्हा होणाऱ्या[illegible]. जोखमीची एक एक पायरी वाढतच गेली आहे.

कशी [illegible]या मनांत चंचलेला तुला द्यावी असं आहे. तुला कितपत पसंत आहे व्यव[illegible]वीन चालीप्रमाणें तूं तिला पत्र पाठवावंस. बाकीचं सर्व माझ्यावर सोपव.

काका

श्री

दादर,
२५ डिसेंबर

प्रिय चंचला,

भावनेची भरती आतां ओसरून गेली आहे. खालीं फक्त परिस्थितीची वाळू राहिली आहे. विवाह आणि मैत्री ह्यांत कोण फरक असतो ! परंपरागत रूढि, सामाजिक दर्जा, पैशाची पिशवी ह्या सर्वांचा परिपाक म्हणजे विवाह, नाहीं ? काल्पनिक खुळं निर्माण करून स्वतःची फसगत करणाऱ्या वेड्या चंचले, ध्येयाच्या वाळूंत तुम्हीं आपलीं तोंडं लपवलींत म्हणून जगाला तुमच्या अस्तित्वाचा थोडाच विसर पडणार आहे ? सरड्याची धांव कुंपणापर्यंत, त्याप्रमाणें तुमची बडबड पण पैशाचा पुजारी भेटेपर्यंतच, आवडी-नावडी पण तोंपर्यंतच ! केवढा दिमाख दाखवतां तुम्ही मुली तरी ! शिक्षणाचा शोक, विद्वत्तेची वाहवा, गुणांचा गौरव, प्रेमाचा प्रांजलपणा, रूढींचा राकटपणा, सर्व कांहीं पैशापुढें, विवाहाच्या बाबतींत तुच्छ असतात. पूर्वीचे विवाह पैसा पाहून झाले, हल्लींचे होतात, आणि भविष्य काळांतीलही होणारच होणार. लहानपणचा पोरकटपणा, म्हातारपणचा म्हातारचळ तसाच प्रणय हा पण एक तारुण्यचळच असतो.

निशिगंधांच्या व्यक्तिमत्वाला पाहून तूं भुललीस. तुला वाटलं, त्यांच्या प्रकाशांत आपल्याला पण चमकायला मिळेल, जगापुढें मिरवायला

मिळेल. पण बेडूक कितीही फुगला तरी बैलाइतका लठ्ठ होणार आहे का कधीं काळीं ?

आज मी पैसाअडका मिळवून बाजारांत पत मिळवून बसलों. आता तुझं प्रेम सहजासहजीं विकत घेऊं शकेन.

तुझ्या संमतीचा प्रश्नच नाहीं. वाघाला शेळी खाण्यापूर्वीं तिची लहेर, घेण्याची काय जरूर ? तुला माझ्याशीं लग्न केलं पाहिजे.

अरविं

श्री पुणें,

३० डिसेंबर

रा. रा. अरविंद यांस,

आपलीं कल्पनेचीं मनोराज्यं खूप चाललीं असतील, नाहीं ? पण मनोराज्यं म्हणजे निव्वळ पत्त्यांचा बंगला. करतां करतांच मोडायचा ! आपल्याला काय वाटलं ? आम्ही मुली म्हणजे काय तुळशीबागेंतल्या राजाराणीच्या बाहुल्या असतों होय ? स्त्रियांना यमपुरीच्या बाहुल्या समजून आपल्याच तालावर नाचवण्याचे पुरुषजातीचे दिवस आतां संपले.

खालीं मान घालून बोहल्याच्या पायऱ्या चढणाऱ्या आणि सोन्यामोत्यांच्या दागिन्यांनीं मढवलेल्या मढ्याला हार घालणाऱ्या मुली आतां फक्त जुन्यापुराण्या कादंबऱ्यांतूनच सांपडतील. कालमानाप्रमाणें मनुष्यस्वभावही बदलत असतो. पूर्वी स्त्री ही बलात्कारानें बनलेली बटीक होती, चूल, मूल नि खूळ ह्यांच्या खाईंत खंगत पडली होती.

आंगणांतल्या अंधारांत जायची तिला भीति वाटत होती. कसायाच्या हातांत हात देणाऱ्या बापाला बोलायला ती कचरत होती. उकिरड्यावर नाचून निघालेल्या नादान नवऱ्याला नमवायला नाखूष होती. ती खरोखरीची अबला होती. पण चुलींत विस्तव घातला, कीं तो बैलांतही आपोआप पसरतोच.

बाहेरच्या जागृतीबरोबर स्त्रियांतही जागृति उत्पन्न झाली. आपल्याला काय विरा..., मी वेल्हेरलाच राहून आपल्या हातांत शिकार सापडूं देईन ?

काढायचं पत्र आल्याबरोबर आपल्या काकांशीं भांडून, ती. दादा मला होणाऱ्या ...ऊन आला आणि लौकरच डॉ॰ अरुणशीं माझं लग्न पण व्हायचं कशी ...ला फसवायचं होतं ना ?

व्यव...घाचं कातडं पांघरणाऱ्या गाढवानें निदान ओरडूं तरी नये, म्हणजे मग ...गालाच संशय येत नाहीं. पण इतकं कळतं तर तें गाढव तरी कसलं ?

माझ्या वरातींत खुंटाखुंटावर नारळ फोडायला माणूस हवा आहे. आपण याल का ? थोड्या पैशांत प्रयोजनाच्या पंक्तींत उदबत्त्या लावायचंही काम कराल का आपण ? पैसे देऊंच कीं. जरा पैसे मिळवायला लागला नाहींत तोंच इतका उन्माद चढला. अजून दिल्ली तर दूर आहे. सारी पुरुषजात म्हणजे सूडाचा मूर्तिमंत अवतार ! सापसुद्धा लाजेनें खालीं फणा करील तुम्हांला पाहून. आपण कितीही पैसे मिळविलेत म्हणून मनाची श्रीमंती थोडीच येणार आहे ? कुत्र्याला उद्या राजा केलं म्हणून तो हाडं चघळायचं थोडंच सोडणार आहे ? सुशिक्षित मुली म्हणजे कांहीं पैसा टाकून मिळणारी भाजी नव्हे.

लग्नपत्रिका पाठवायला मी मुळींच विसरणार नाहीं. याल ना लग्नाला ?

चंचला

श्री

वेल्हेर,
५ जानेवारी

चि. दादास अनेक आशीर्वाद,

आम्हांला अवमानून आमच्या मनाविरुद्ध चंचलेला आपण डॉ. अरुणला दिलींत. आमचा आतां कांहींच संबंध उरलेला नाहीं. लग्न झालं आहेच. आपण दुसरीकडे आश्रयाला जावं. आपल्यासारख्या खुशालचेंडूंना सारं जग मोकळं आहे. आमचं घर धर्मशाळा खास नव्हे. ज्या अर्थी आपण आपल्या

स्वतःच्या जबाबदारीवर चंचलेचं लग्न जुळवलं, त्या अर्थी आपण आपल्या कुटुंबाची सर्वच जबाबदारी पत्करायला समर्थ आहांत. आपली कर्तबगा पाहून अतिशय आनंद होतो आहे. फार थोडे लोक इतक्या लहान्‌ा इतकी जबाबदारी पार पाडूं शकतात. आपल्या विकासाला मी तरी उगीचच मर्यादा घालूं? बरं झालं. ह्यापुढें आमची तरी चिंता आपण घरदार केलंत म्हणजे मी मजेनें राहायला येईनच. ल. आ. मो.)

५

श्री अरुण निवास, डे. जिमखाना,

६ जानेवारी

प्रिय इरावती,

इच्छा नि तिची सफलता ह्यांच्यांत परिस्थितीचं दाट धुकं पसरलेलं असतं. मानवी जीवन हें निरनिराळ्या चुकांनीं भरलेलं असतं, म्हणूनच मनुष्यमात्राला परमेश्वरानें क्षमेची सवलत ठेवली आहे. आपण परस्परांना प्रीतीचीं नि लग्नाचीं वचनं दिलीं, पण काकांनीं दाखविलेल्या इस्टेटीच्या मोहाला मी बळी पडलों नि चंचला नांवाच्या एका मुलीशीं विवाहबद्ध झालों. विवाह-हिंदुविवाह चक्रव्यूहासारखा. आंत जायला राजमार्ग असतो. पण बाहेर पडायला? मार्गच नाहीं मुळीं त्याला! चंद्रसूर्यांचं तरी एक-मेकांना दर्शन होत असेल. पण आमच्यांतील वधूवर, विचार, आचार नि मनोभूमिका ह्यांनीं परस्परांहून भिन्न आणि एकमेकांना पूर्वीं कधींही न पाहिलेलं.

लग्नापूर्वीं जिचे आचारविचार आपल्या आचारविचारांशीं जुळतात तिच्याशीं मैत्री व्हायला मुळींच आडकाठी नाहीं. पण त्याच मैत्रींतून विवाहाचं फल निष्पन्न झालं, कीं एकच गहजब करायचा. चंचलेशीं माझं लग्न झालं, पण भटाभिक्षुकांच्या पाठ केलेल्या चार मंत्रांनीं नि बँडवाजंत्र्यांनीं तिच्याविषयीं प्रेम थोडंच उत्पन्न होणार आहे? त्याला लग्नापूर्वीचा चिर-सहवासच हवा!

लग्नापूर्वी कुणाशीं तरी वाङ्निश्चय झाला असेल नि माझ्याशीं झालल लग्न पण तिच्याही मनाविरुद्ध असेल. एकूण लग्न म्हणजे काय? दोन परस्पर-विरोधी गोष्टींची सांगड घालणारी संस्था. चंचलेबरोबर मला सारा जन्म काढायचा आहे आणि तिच्यावर सक्तीनें प्रेम पण करायचं आहे. पुढें होणाऱ्या मुलांबाळांचं आमचीं मुलं म्हणून पालनपोषण करायचं आहे! कशी आहे समाजपद्धति! मनुष्याकरितां समाजव्यवस्था नसून समाज-व्यवस्थेसाठींच जणूं कांहीं मनुष्य आहे.

डॉ. अरुण

श्री अरुण निवास, डे. जिमखाना,

७ जानेवारी

प्रिय प्रेमा,

माझं लग्न झाल्यानंतर तुला असं मी हें पहिलंच पत्र पाठवीत आहें. अरविंदांना मी पाठवलेल्या पत्राची शहानिशा पत्रांतून करणं मुळींच योग्य नाहीं. तुझी माझी प्रत्यक्ष गांठ पडल्यावर मी सर्व सांगेनच. ती. स्व. दादाचं गेल्या दोन महिन्यांत मुळींच पत्र नाहीं. तो सध्यां नोकरी शोधण्याकरितां परगांवीं गेला आहे. 'इथें' त्याला राहाण्याचा पुष्कळ आग्रह केला. पण पंख फुटलेल्या पांखराला घरट्यांत बसून थोडंच बरं वाटणार आहे? जातांना आईला पण बरोबर अट्टाहासानें तो घेऊन गेला.

मावशीच्या यजमानांच्या मनाविरुद्ध दादानें माझं लग्न ठरवलं म्हणून त्यांचं घर आम्हांला परकं झालं आहे. आणि म्हणूनच मावशी पण जरा कांहीं दिवस इकडे येऊं शकत नाहीं. अलीकडे 'इथें' घरीं यायला फारच उशीर होतो. आणि येतात तेसुद्धा अगदीं मुक्यासारखे. निशिगंधांशीं सहवास घडल्यापासून दुसऱ्या कुठल्याही माणसाशीं माझं मन आधीं रमलंच नसतं. तशांत घरीं हा प्रकार! मीं पुष्कळ त्यांच्या खिन्नतेचं कारण विचारलं, पण तोंडाला घातलेल्या कुलुपाची किल्ली थोडीच आणतां येते! लहानपणीं आपण कादंबऱ्या वाचत असूं. कादंबऱ्यांतील ते नायक नि त्या नायिका,

एकमेकांवर किती निस्सिम प्रेम करीत असत ! लग्नं तरी किती साहजिकपणें जुळत असत त्यांचीं ! आणि लग्नानंतरचीं त्यांच्या वागणुकीचीं वर्णनें वाचून आपल्याला स्वर्ग दोन बोटं उरत असे. पण वाङ्मयसृष्टींतला तोच दोन बोटांचा स्वर्ग, व्यवहारसृष्टींत उतरला म्हणजे किती तरी हात दूर पळालेला असतो !

नोकरीसाठीं दादा देशोधडीला लागलेला. हल्लींच्या समाजव्यवस्थेंत राहून नोकरीसाठीं धडपड करायची ! भिंतीवर डोकं आपटलं म्हणून भिंत थोडीच दूर सरकणार आहे ? मनुष्याचं डोकंच फुटून निघेल. पैसे होते तोंपर्यंत दोन्ही मारे दिमाखानें वागला. पण बाणाप्रमाणें परिस्थिति पण उलटली तर ? दरिद्री माणसाला कोणीही जवळ करीत नाहीं. एकवेळ कुत्रा दाराशीं आला तर मनुष्य त्याच्या अंगावरून ममतेनं हात तरी फिरवील; पण तोच एकादा भिकारी दारांत आला तर ? मनुष्य हा मनुष्याचाच आजकाल शत्रु झाला आहे.

निशिगंध तर धकाधकीच्या मामल्यांत पडलेले. त्यांचं केव्हां काय होईल नेमच नाहीं. तिकडूनही माझ्या काळजीचं द्वार खुलंच आहे.

विरुद्ध प्रवाहांत मनुष्य किती वेळ उभा राहूं शकेल बरं ? पायाखालची भुसभुशीत वाळू निसटतां निसटतां त्याला प्रवाहपतितच व्हावं लागेल. सर्व निमूटपणें सहन करावं हा उपदेश ठीक आहे. कारण गर्जेल तें पडेल काय ?

सौ. चंचला

श्री

दादर,
८ जानेवारी

प्रिय डॉ० अरुण,

आपली माझी ओळख नसतांना आपल्याला पत्र लिहायचं धाडस करीत आहें, तरी क्षमा असावी. आपल्या सुखांत माती कालवण्याऐवजीं आपल्याला योग्य वेळीं जागरूक करण्यासाठीं आपल्या सुशील पत्नी सौ. चंचलाताई

ह्यांनीं आपले जुने प्रियकर श्री. निशिगंध ह्यांना लिहिलेल्या पत्रांचा संग्रह आपल्या अवलोकनार्थ पाठवीत आहें. अलीकडे जुने कागदपत्र चाळण्याची बऱ्याच लोकांना हौस असते. आपली पण घटकाभर करमणूक होईल. आपण सुशिक्षित लोक आपल्या पत्नीच्या वाटेल तशा वागणुकीला, मौजेपेक्षां थोडीच अधिक किंमत देणार आहांत! आपल्या पत्नीला म्हणावं, आपल्या निमंत्रणाप्रमाणें आपल्या लग्नाला जरी हजर राहूं शकलों नाहीं, तरी उशीरानें का होईना पण हा अहेर पाठवीत आहें.

अरविंद

श्री अरुण निवास, डे. जिमखाना,

१० जानेवारी

प्रिय प्रेमा,

अरविंदांनीं माझं आणि निशिगंधांचं रहस्य अरुणांना कळवून व्यक्तिगत सूड उगवून घेतला. सापाप्रमाणेंच सूड पण कितीही जुना झाला तरी कांत टाकून तो नवाच राहात असतो. कळला आतां अरविंदाचा स्वभाव कसा आहे तो?

पण अरुण पडले अतिशय शांत स्वभावाचे. त्यांनीं सर्व पत्रं वाचून पाहिलीं. माझ्यावर रागावण्याऐवजीं त्यांच्या डोळ्यांत आसवं उभीं राहिलीं. त्या भरांत त्यांनीं विवाहापूर्वीचं आपलं पण प्रेमरहस्य सांगितलं आणि समाजासाठीं त्यांच्या मनाविरुद्ध त्यांना माझ्याशीं संसार करणं प्राप्त आहे अशी पण कबुली लागलीच देऊन टाकली.

अरुण आणि मी! लग्नाला जमलेल्या समाजानें आमच्यावर टाकलेल्या अक्षतांनीं, भिक्षुकांनीं म्हटलेल्या मंत्रांनीं आणि वाजंत्र्यांनीं गाल फुगवून वाजवलेल्या वाजंत्र्यांनीं आमचं लग्न साजरं झालेलं!

लग्नाच्या वेळीं बोहल्यावर असतांना आम्हां दोघांत जो शुभ मंगलाचा पडदा आडवा होता, तोच पडदा आज आम्हां दोघांच्या मनाच्या अवस्थेत

पण आहे. आणि तो जन्मभर पण तसाच राहील. लोकांना काय, पानसुपारी व्यवस्थित मिळाली, प्रयोजनाच्या पंक्तींत भरपूर आग्रह झाला म्हणजे लग्न व्यवस्थित झालं असं वाटतं. वरातीची मोटार फुलापानांनीं सजवली, कोपऱ्या कोपऱ्यावर भुईनळे, चंद्रज्योति उडवल्या म्हणजे बायाबापड्यांना कोण आनंद होतो! पण ज्यांच्याकरितां खरोखर लग्न असतं त्यांच्या मनःस्थितीचा कुणीं तरी विचार केला आहे का कधीं काळीं ? हारगुच्छांनीं सजवलेल्या मोटारींतील आमच्या मेलेल्या मनाचीं मढीं दिसतील तरी का कुणाच्या डोळ्यांना ?

मनुष्याला सुख लाभावं म्हणून समाज अस्तित्वांत आला. पण समाजाच्या सुखासाठींच मनुष्याला आपल्या व्यक्तिगत सुखावर पाणी सोडण्याची पाळी आली. मोहिनीसाठीं हपापलेल्या भस्मासुराला शेवटीं स्वतःचाच नाश करून घ्यावा लागला. मानवी समाजावर उपकार करण्याकरितां, विवाहसंस्था ज्या महापुरुषानें लादली तो स्वतः मात्र ब्रह्मचारी राहून नेमका ह्या संस्थेच्या जाचांतून निसटून गेला असेल.

अरुणांना मी आवडत नसलें तर आपल्या आवडत्या स्त्रीशीं लग्न करण्याची परवानगी देऊन त्यांची वाट मी मोकळी करूं शकल्यें. पण त्यांची किती का इच्छा असेना, नावडत्या नवऱ्याच्या बायकोला आमच्या समाजांत मुळीं स्थानच नाहीं. नदीची दिशा उतार ठरवीत असतो. त्याप्रमाणें आम्हांला काय आवडावं, काय नावडावं हें सारं समाजानेंच ठरवून द्यायचं आणि आम्ही मुकाट्यानें वाऱ्याच्या दिशेला शिडं उभारायचीं!

सध्यांच्या परिस्थितींत मी जगायचं म्हणजे अरुणांच्या आणि त्यांच्या प्रियेच्या मार्गांत नसती अडचण निर्माण करायची. जगांत अडचण होऊन बसणाऱ्या माणसाला एकच जागा असते. आणि ती म्हणजे जगापासून अगदीं दूर-मृत्यूच्या साम्राज्यांत.

समोरच्या मुलींच्या शाळेच्या इमारतीची ह्या प्रवाहांत पडछाया पडली आहे. शाळेंत असतांना आपण कोण आशावादी होतों! ह्या साऱ्या मुली पण अशाच आशेनें फुलून गेल्या असतील. निराशा ठाऊकच नसते त्यांना.

लहानपणीं आपण पावसाच्या पाण्यांत सोडलेली नाव समुद्रापर्यंत वाहात जाईल अशी आपली आशा असते. पण हाता दोन हातांवरच ती बुडून नाहीं का जात ? आपल्या लहानपणच्या ध्येयांची पण तीच गत होत नसते का ?

थंडीनें माझं आंग थरथर कांपेल. गार वाऱ्यानें माझ्या सर्वांगावर कांटा उभा राहील. थंडगार पाण्यानें माझे हातपाय गारठतील. पण माझं मन ? मी मृत्यूला मुळींच भीत नाहीं. मन मेल्यावर शरीराची थोडीच काळजी वाटत असते ? मनुष्याच्या मनाचा चोहोंकडून कोंडमारा झाला, आशेच्या किरणाचे सर्व झरोके बंद झाले, कीं मृत्यूला मगरमिठी मारण्यावाचून गत्यंतरच नसतं.

बिनपट्ट्याच्या कुत्र्याला गोळी घालून ठार मारण्यांत येतं. बिननशिबाच्या माणसाला हा नदीचा पवित्र प्रवाह आहे कीं !

'माती असशी मातिस मिळशी । व्यर्थ गर्व हा मग कां धरिशी ।' तें पाहा कुणी तरी गुणगुणत चाललं आहे. येतें हं प्रेमा !

चंचला

संग्रहालय
अनुक्रम २९६६८
विभाग वा.वा
क्रमांक ९८५०
नों. दि. २-७-६१

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. ३६५८ नों दि. ..........
वि. क्र. वा. वा. ..........

कै. वामन मल्हार जोशी ह्यांनीं "इंदू काळे आणि सरला भोळे" ह्या कादंबरींत यशस्वी केलेलें तंत्र ह्या कादंबरींत श्री. गर्दे ह्यांनीं वापरलें आहे.

मार्मिक व चपखल उपमा आणि सामाजिक रूढींवरील धारदार टीका ह्यांनीं ही कथा अत्यंत परिणामकारक झाली आहे.

आजच्या समाजांतील सुशिक्षित (?) पण दुर्बल मनाच्या तरुणींना त्यांच्या संभाव्य नियतीचा इषारा देणारा दीपस्तंभ म्हणून ही कथा मराठी कथावाङ्मयांत महत्त्वाचें स्थान घेईल.